नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट,नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १९५ * * अमरावती * शनिवार, दिनांक १७ जानेवारी २०२६ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## पराभूत उमेदवाराची पक्ष कार्यालयावर दगडफेक

■ वृत्तसंस्था, धुळे, दि. १६ :
महानगरपालिका निवडणुकीच्या निकालांनंतर धुळ्यात भारतीय जनता पक्षामध्ये मोठा राडा झाला आहे. शहरातील चाळीसगाव रोड चौफुली जवळील भाजप कार्यालयावर भाजपच्याच पराभूत उमेदवाराच्या समर्थकांनी भीषण दगडफेक केल्याची घटना घडली आहे.

प्रभाग क्रमांक १६ मधील भाजपचे पराभूत उमेदवार आकाश शिंदे यांच्या समर्थकांनी हा हल्ला केला. त्यात नवनिर्वाचित नगरसेविका तथा माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर या गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आपल्याच पक्षाच्या उमेदवाराने पक्षाच्या कार्यालयावर हल्ला केल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

## मुंबईतही सुयश

आग्रलेख
खरीखरी..
श्रीकृष्ण चांडक



महाराष्ट्रातील २९ महानगर पालिकांच्या निकालात भाजपने धवल सुयश मिळवलेले आहे. शहरी भागात भाजप आणि भाजपच पहिल्या क्रमांकावर आहे हे आता सिद्ध झालेले आहे. मुंबई शहर केवळ महाराष्ट्रातच नाही तर भारतातील अत्यंत महत्त्वाचे शहर आहे. मुंबईला आर्थिक राजधानी म्हणतात ते उगीचच नाही. मुंबईला या निवडणुकीच्या निकालांनी वेगळे नेतृत्व दिलेले आहे कारण या शहरात महायुती विरुद्ध ठाकरे बंधूंची जोडी यांची लढाई निश्चितच दोन्ही पक्षांनाही वेगवेगळे मार्ग दाखवणारे ठरली. २५ वर्ष शिवसेनेने मुंबईवर अधिराज्य केलेले होते. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना त्यांनी एक वक्तव्य केले होते, त्यामध्ये मराठी जनतेला आपला स्वाभिमान दाखवण्याचे त्यांनी जणूकाही आव्हानच केले होते. काँग्रेसला तर असा भाषिक संघर्ष तेव्हाही करता येत नव्हता आणि आताही त्यांना करता आला नाही त्यामुळेच की काय मोठ्या ठाकरेंच्या सोबत आल्याबरोबर काँग्रेसने मुंबईत स्वबळाचा नारा दिला. काँग्रेसने शिवसेनेबरोबर आघाडी करून २०१९ आली सत्ता स्थापन करण्यात आली होती. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांना त्यांच्याच पक्षातील सहकाऱ्यांनी अक्षरशा गोत्यात आणले आणि त्यानंतर आरोप झाले. मग ते पोत्यातून भरून पैसे आणले, गद्दार झाले अशा प्रकारच्या आरोपांनी काही फरक पडला नाही. आता मुंबईचे निकाल पाहिल्यावर, ती शिवसेना आणि ही शिवसेना यांचे मुंबईतील मराठी माणसांचे प्रेम दिसून आलेले आहे असे म्हणता येणार नाही काय? राज्याचे शिलेदार देवेंद्र फडणवीस यांनीही जुनी शिवसेना वश होत नाही हे पाहून फुटलेल्या शिवसेनेला चिन्हासहित महाराष्ट्रात प्रस्थापित केले. वरिष्ठांनीही म्हणजेच भाजप मधल्या वरिष्ठांनीही शिवसेनेला मुख्यमंत्रीपद दिले. एवढे सर्व करूनही मुंबईतील प्रस्थापित केलेल्या शिवसेनेला ठाकरे बंधूंच्या शिवसेनेपेक्षा अध्यार्पेक्षा कमी जागाही जिंकता आलेल्या नाहीत हे वास्तव आहे. आज देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिकेत भाजपने आपला झेंडा रोवला आहे म्हणजे केंद्रात भाजप सरकार, आता महाराष्ट्रात राज्य भाजपचे, सर्वात मोठ्या महापालिकेत म्हणजे मुंबईत महापौर भाजपचा, एकूणच सत्ता भाजपाची आणि त्यासोबत शिवसेनेच्या चटणीमुळे जेवणाचा स्वाद खमंग झाल्याचे म्हणता येईल. खरे तर ठाकरे बंधू यांनी एक गोष्ट लक्षातच घेतली नाही ती गोष्ट म्हणजे मराठी माणूस शिवसेनेत आहे तसेच जन्माने मराठी नसलेले परंतु मराठी बाणा जपणारे मोठ्या प्रमाणावर सदस्य ठाकरे यांच्या शिवसेनेत आहेत. वेगळ्या शब्दात सांगायचे तर आता मुंबईत मराठी माणसाला इतरांबरोबर युती करूनच राज्य करता येईल. आजच्या निकालांनी मुंबईच्या भाषिक राजकारणाला नवे वळण लावलेले आहे. तुम्ही कितीही नावे ठेवली तरी आज मुंबईत अमराठी लोक बहुमतात आहेत हे चित्र उघड आहे. काँग्रेस बरोबर दोस्ती करून उद्धव रावांना फार मोठा फायदा झाला असता असे म्हणता येणार नाही. पण राज साहेबांपेक्षा त्यांच्याबरोबर आघाडी केली असती तर काही जागा वाढल्या असत्या असे बरेच तज्ञ लोक म्हणतात. राज साहेबांनी शिवतीर्थापासून सगळ्याच ठिकाणी उत्तम भाषण करून जे जे मुद्दे मांडले त्याला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला, पण नेहमी प्रमाणेच मतसाद मिळाली नाही. या निकालानंतर आता आजपासून दमदार विरोधी पक्ष म्हणून काम करणे आणि भविष्यामध्ये मुंबईकरांच्या अपेक्षांना आणि समस्यांना वाचा फोडणे हे त्यांचे काम असणार आहे. आता भारतीय जनता पक्षाच्या सोबत असलेल्या पक्षांना म्हणजेच महायुतीला जो काही विजय मिळाला आहे. त्यामुळे त्या पक्षांनाही आपले पाय मुंबईत अधिक घट्टपणे उभे राहण्यासाठी काही गोष्टी करून आपले पाय अजून मजबूत करावयाचे आहेत. नागपूरच्या पठ्ठ्याने लीलया विजय मिळवून केवळ आपल्या पक्षालाच नाही तर स्वतःलाही निर्विवाद नेता म्हणून प्रस्थापित केलेले आहे. ही त्यांच्या यशाची पायवाट त्यांना अधिक उज्वल करेल यात शंका नाही.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## ठाकरे बंधूंचा बुरूज ढासळला : आघाडीची घसरगुंडी

# भाजपाची मुसंडी!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / मुंबई, दि. १६ :
राज्यातील २९ महापालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर भारतीय जनता पक्ष हाच नंबर १ ठरला. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मीरा भाईंदर, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूरसह प्रमुख महापालिकांवर महायुतीने सत्ता काबीज केली.

तेवीस महापालिकांमधे सर्वाधिक नगरसेवक म्हणून भाजपाने स्थान मिळवले. मुंबई महापालिकेवर भाजपा- शिवसेना (शिंदे) महायुतीने विजय मिळवला आणि सलग पंचवीस वर्षे सत्तेवर असलेल्या ठाकरेंच्या शिवसेनेला हटविण्याचा संकल्प पूर्ण केला. वीस वर्षानंर एकत्र आलेल्या ठाकरे बंधुंना मुंबईकरांनी नाकारले.
उध्दव ठाकरे यांच्या सेनेने भाजपा व शिंदे शिवसेनेशी अटीतटीची झुंज दिली पण राज ठाकरेंच्या मनसेचा कुठेच प्रभाव पडला नाही. ठाण्यावर फक्त आपलेच वर्चस्व हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सिध्द करून दाखवले. नवी मुंबईत फक्त आपलेच चालणार हे वनमंत्री गणेश नाईक यांनी दाखवून दिले.



पुणे व पिंपरी चिंचवडमधे भाजपाकडून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दारूण पराभव पत्करावा लागला. हिंतेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीने वसई- विरारचा गड कायम राखला. दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे पुत्र अमित देशमुख यांनी लातूरमधे काँग्रेसची सत्ता आणून भाजपाला धडा शिकवला.

७० हजार कोटी रूपयांचे बजेट असलेल्या मुंबई मनपाकडे अख्ख्या राज्याचे लक्ष लागून राहिले होते. जवळपास ३० वर्षे येथे शिवसेनेचे राज्य होते. यावेळी उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंची मनसे एकत्र येत त्यांनी आव्हान उभे केले होते. तथापि, भाजपा-शिंदेसेनेच्या झंझावातात ठाकरे बंधूंचा टिकाव लागला नाही. बीएमसीमध्ये भाजपा-शिंदेसेनेने स्पष्ट बहुमत मिळवले असून, येथे भाजपाचा महापौर होणे निश्चित मानले जात आहे.

दरम्यान, राज्यातील २९ पैकी २३ मनपामध्ये भाजपाने मुसंडी मारली असून, कुठे स्वबळावर तर कुठे शिंदेसेनेसह सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झाल्याचे दिसून येते.
विदर्भातील नागपूर मनपात भाजपाने १०२ जागांवर विजय मिळवत एकहाती सत्ता हस्तगत केली आहे.
८० सदस्यीय अकोला मनपात भाजपाला ३८ जागा जिंकता आल्या. येथे स्वबळावर सत्ता स्थापन करणे त्यांना शक्य नाही. अमरावतीमध्ये एकूण ८७ पैकी २५ जागा जिंकून भाजपा क्रमांक १ चा पक्ष ठरला असला तरी सत्तेसाठी त्यांना युवा स्वाभीमान व शिंदेसेनेचा आधार घ्यावा लागणार आहे.
भाजपाचे माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा गड मानल्या जाणाऱ्या चंद्रपूर महानगर पालिकेत मात्र काँग्रेसने विजयी पताका फडकावली आहे. ६६ सदस्यीय चंद्रपूर मनपात भाजपाला २३ जागाच जिंकता आल्या.
दरम्यान, मुंबई मनपामध्ये रात्री उशिरापर्यंत निकालाची अंतिम आकडेवारी समोर आली नव्हती. नागपूर महानगरपालिकेत काँग्रेसने गेल्या वेळेच्या तुलनेत यावेळी चांगली कामगिरी केली असून, त्यांच्या ८ जागा वाढल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे येथे यावेळी एमआयएम आणि इंडियन मुस्लीम लीगने चांगलीच मुसंडी मारल्याचे दिसून येत आहे.

## जनतेने विकासाचा ब्रँड निवडला नकारात्मकता नाकारली : शिंदे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
राज्यातील महानगरपालिका निवडणुकांतील दणदणीत विजयानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, राज्यातील जनतेने विकासाचे राजकारण निवडले आहे. बीएमसीमध्ये भाजप-शिवसेनेने चांगली कामगिरी केली आहे.



मुंबईतील जनतेने महायुतीला बहुमत दिले आहे. यासाठी मुंबईकरांचे मनापासून आभार. जनतेने भाजप आणि शिवसेनेवर विश्वास दाखवला आहे. आम्ही विकासाच्या मुद्द्यावर पुढे जात आहोत. लोकांना विकास हवा आहे. जनता भावनिक राजकारणात अडकत नाही. जनतेने नकारात्मकतेचे राजकारण नाकारले आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नोंदवली.

## २० जानेवारीला मिळणार भाजपला राष्ट्रीय अध्यक्ष

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :
भाजपला २० जानेवारी रोजी नवीन राष्ट्रीय अध्यक्ष मिळेल. पक्षाने यासाठी शुक्रवारी अधिसूचना जारी केली. यानुसार, १९ जानेवारी रोजी यासाठी उमेदवारी अर्ज भरले जातील. २० जानेवारी रोजी भाजपच्या नवीन अध्यक्षांच्या नावाची घोषणा केली जाईल.सध्या नितीन नबीन यांना कार्यकारी अध्यक्ष बनवण्यात आले आहे.

## पुढचा जल्लोष महापौर बसवल्यावर : फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :
महापालिका निवडणुकीत अनेक ठिकाणी भाजप आणि शिवसेना युती आघाडीवर आहे. यानिमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील भाजपच्या कार्यालयात जाऊन निवडून आलेल्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.
मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप आणि महायुतीची सत्ता येत आहे. सर्वांचे लक्ष लागलेल्या मुंबईच्या महापालिकेतही जी काही वाटचाल सुरू आहे, त्यानुसार पूर्ण बहुमत महायुतीलाच मिळणार आहे. आपण या निवडणुकीत विकासाचा अजेंडा घेऊन गेलो. याच विकासाच्या अजेंडाला जनतेने भरभरून प्रतिसाद दिला आहे. लोकांना विकास हवा आहे म्हणून त्यांनी आपल्याला निवडून दिले आहे.
पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमचा अजेंडा हा विकासच असणार आहे. प्रत्येक माणसाच्या जीवनात परिवर्तन आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. एवढे मोठे समर्थन जेव्हा मिळते, तेव्हा जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. आपल्याला जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे. लोकांनी दाखवलेल्या विश्वासाला तडा जाऊ देऊ नका, असा सल्ला त्यांनी दिला. आपला महापौर बसवल्यानंतर पुढचा जल्लोष करू, असेही ते म्हणाले.
कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमामुळे भाजपने मिळवलेला विजय भाजपने केलेला विकास दर्शवितो, असेही त्यांनी स्पष्ट केले.



भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले, आज खरेतर आम्हा सर्व भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांसाठी अत्यंत आनंदाचा दिवस आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने जे स्वप्न पाहिले होते की येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत यशाच्या दिशेने पक्ष नेण्याच्या दृष्टिकोनातून गेली अनेक वर्ष हा बूथ लेव्हलवर ताकदीने प्रयत्न करत असताना दिसून येतो.
असे अनेक कार्यकर्ते आहेत त्यांना निवडणुकीत संधी मिळाली नाही, त्याग आणि समर्पणाची भूमिका त्यांनी पार पाडली.
देशाचे पंतप्रधान मोदीजी, अमित भाई असतील आणि सर्व नेतेगण आणि आमचे सर्वांचे नेते आदरणीय देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राला एक दिशा देण्याचे काम केले आहे. संपूर्ण निवडणूक ही विकासाच्या दिशेने नेण्याचे काम केले, असे मत प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केले.

## ओवेसींच्या एमआयएमची मुसंडी

### २९ पैकी १३ महापालिकांमध्ये एकूण ९५ उमेदवार विजयी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
मुंबईसह राज्यातील २९ महापालिका निवडणुकांचे निकाल जाहीर होत असताना महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल स्पष्टपणे दिसून येत आहेत.
या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला सर्वाधिक जागा मिळताना दिसत असल्या तरी, या निकालातील सर्वात ठळक बाब म्हणजे असदुद्दीन ओवेसी यांच्या नेतृत्वाखालील एमआयएमने केलेली अभूतपूर्व मुसंडी.
भाजप व पारंपरिक प्रादेशिक पक्षांबरोबरच आता एमआयएम हा महापालिका राजकारणातील एक महत्त्वाचा घटक ठरत असल्याचं या निकालांमधून अधोरेखित झालं आहे. राज्यातील २९ पैकी १३ महापालिकांमध्ये एमआयएमचे एकूण ९५ उमेदवार विजयी झाले असून, हा आकडा पक्षासाठी ऐतिहासिक मानला जात आहे.
एमआयएमची कामगिरी केवळ मराठवाडा किंवा मुस्लिमबहुल भागांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर या पक्षाने मुंबईसारख्या महानगरातही ठळक उपस्थिती नोंदवली आहे. विशेष बाब म्हणजे मुंबईतील काही प्रभागांमध्ये एमआयएमने थेट दिग्गज आणि पारंपरिक राजकीय गटांचे गणित बिघडवले आहे.
अबू आझमी यांच्या समाजवादी पक्षाचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या मानखुर्द परिसरात एमआयएमने विजय मिळवत मोठा राजकीय धक्का दिला आहे. मुंबईतील हा निकाल पाहता, एमआयएम आता केवळ पयार्यी पक्ष न राहता थेट



स्पर्धक म्हणून पुढे येत असल्याचं चित्र स्पष्ट झालं आहे.
मुंबई महानगरपालिकेत एमआयएमने सहा जागांवर विजय मिळवला आहे. या विजयी उमेदवारांमध्ये प्रभाग क्रमांक १३४ मधून मेहजबिन खान, १३६ मधून जमीर कुरेशी, १३७ मधून समीर पटेल, १३८ मधून रोशन शेख, १३९ मधून शबाना शेख आणि १४५ मधून खैरुनिसा हुसेन यांचा समावेश आहे.
या निकालांमुळे मुंबईतील राजकीय समीकरणांमध्ये लक्षणीय बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यपातळीवर पाहता, एमआयएमने २९ महापालिकांपैकी १३ महापालिकांमध्ये एकूण ९५ जागांवर विजय मिळवला आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत एमआयएमने २४ जागा जिंकत दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष होण्याचा मान मिळवला आहे.

## निवडणूक आयोगाकडून जनतेची दिशाभूल

### राहुल गांधींचा संताप

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :
काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीत बोटावरील शाई पुसण्याच्या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. व्होट चोरी एक देशविरोधी कृत्य आहे. विशेषतः निवडणूक आयोगाकडून जनतेची होणारी दिशाभूल हेच लोकशाहीवरील विश्वास संपण्याचे प्रमुख कारण आहे, असे त्यांनी म्हटले आहे.
राहुल गांधी यांनीही आज निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये एका वृत्तपत्राचे वृत्त पोस्ट करत त्यात बोटावरील शाई कशा प्रकारे पुसली जात आहे हे दिसून येत आहे. राहुल गांधी आपल्या पोस्टमध्ये म्हणाले, निवडणूक आयोगाकडून जनतेची होणारी दिशाभूल हेच लोकशाहीवरील विश्वास संपुष्टात येण्याचे प्रमुख कारण आहे. व्होट चोरी हे राष्ट्रविरोधी कृत्य आहे. राहुलच्या या पोस्टवर अनेकांनी संमिश्र प्रतिक्रिया दिल्या आहेत.

## ३० वर्षानंतर ठाकरे कुटुंब मुंबई मनपाच्या सत्तेतून बाहेर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :
मुंबईच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपचा महापौर होऊ शकतो. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या निकालात भाजप आघाडीला एकूण २२७ जागांपैकी ११८ जागांवर आघाडी मिळाली आहे. यामध्ये भाजप ९०, शिवसेना शिंदे गट २८ जागांवर पुढे आहे.
स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांपासून मुंबई महानगरपालिकेवर काँग्रेस आणि शिवसेनेचेच वर्चस्व राहिले आहे.



१९४७ ते १९६७ पर्यंत म्हणजे २० वर्षे काँग्रेसचा महापौर होता. तर १९९२ ते २०२२ म्हणजे ३० वर्षे महापौरपदावर शिवसेनेचे वर्चस्व होते. भाजपने ४५ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच मुंबईत आपला महापौर बनवण्याच्या स्थितीत पोहोचली आहे. खरं तर, १९८० मध्ये पक्षाची स्थापना झाल्यानंतर भाजपने १९९२ ते २०१७ पर्यंत मुंबईत शिवसेनेला पाठिंबा दिला होता.
मुंबईच्या महापौरपदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या शेवटच्या व्यक्ती शिवसेनेच्या किशोरी पेडणेकर होत्या, ज्यांनी २२ नोव्हेंबर २०१९ ते ८ मार्च २०२२ पर्यंत हे पद सांभाळले होते. त्यावेळी शिवसेनेत फूट पडली नव्हती. त्यानंतर हे पद रिक्त होते. तेव्हापासून, बीएमसीच्या प्रशासनाची जबाबदारी नगर आयुक्त सांभाळत आहेत.

## घड्याळाचे काटे उलटे फिरले

### तुतारीचा आवाज बंद....

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६ :
राज्यात महापालिका निवडणुकीचा निकाल आता जवळपास स्पष्ट झाला आहे. महाराष्ट्राच्या महापलिका निवडणुकींमध्ये भाजपनं पुन्हा एकदा जोरदार मुसंडी मारली आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी अजित पवार गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाला मात्र मोठा धक्का बसला आहे.



राष्ट्रवादी अजित पवार गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाला या महापालिका निवडणुकीमध्ये म्हणावं तेवढं यश मिळालेलं नाही. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार १२२ जागांवर आघाडीवर आहेत, तर राष्ट्रवादी शरद पवार गटाची अवस्था याहून वाईट आहे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार केवळ २९ ठिकाणी आघाडीवर आहेत.
पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादीने आघाडीने केली होती. राष्ट्रवादी शरद पवार गट, राष्ट्रवादी अजित पवार गट विरूद्ध भाजप असा सामना पुण्यात होता, मात्र पुण्यात राष्ट्रवादीला पराभवाचा मोठा धक्का बसला आहे.
पुण्यात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार मोजक्या जागांवर आघाडीवर होते, तर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार हे दोन जागांवर आघाडीवर होते.
पिंपरी चिंचवडमध्ये देखील अशीच अवस्था पहायला मिळत आहे. पिंपरी चिंचवडमध्ये देखील भाजपनं दोन्ही राष्ट्रवादीला धोपीपछाड दिला आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार ३७ जागांवर आघाडीवर होते. राष्ट्रवादी शरद पवार गटाला तर पिंपरी चिंचवडमध्ये भोपळा देखील फोडता आलेला नाही.

## महापौर ठरवण्यासाठी आकडे दाबले?



■ **मुंबई :** राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी काल शांततेत मतदान पार पडल्यानंतर आज मतमोजणीला सुरुवात झाली आहे. मात्र, निकालापूर्वीच निवडणूक आयोग पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर तीव्र टीका करत गंभीर आरोप केले आहेत. निकालाला काही तास उरले असताना सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर केलेल्या पोस्टमधून रोहित पवार यांनी आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त करत म्हटले आहे की, काही वेळातच मतमोजणी सुरू होणार असताना अद्याप मुंबईसह अनेक महानगरपालिकांमधील मतदानाची अंतिम आणि अधिकृत टक्केवारी जाहीर करण्यात आलेली नाही. हा प्रकार आजवर कधीही पाहायला मिळालेला नसल्याचे सांगत त्यांनी आयोगाच्या हेतूंवरच संशय व्यक्त केला आहे. महापौर कोणाचा बसवायचा, याचे गणित शेवटच्या क्षणी जुळवण्यासाठीच मतदानाची टक्केवारी जाहीर केली जात नाहीये ना? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. याचबरोबर निवडणूक आयोगाने आपली भूमिका स्पष्ट करावी, अन्यथा आम्ही भाजपाची बी टीम आहोत, हे जाहीरच करावे, अशी उपरोधिक पण तीव्र टीकाही रोहित पवार यांनी केली आहे.

### विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या घरात
## तिघांना नगरसेवक होण्याचा मान



■ **मुंबई:** विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना मुंबई महानगरपालिका निवडणुकीत मोठे यश मिळाले. त्यांचे बंधू एडवोकेट मकरंद नार्वेकर, वहिनी हर्षिता अश्विन नार्वेकर आणि बहीण डॉ. गौरवी शिवलकर नार्वेकर या तिघांनी भारतीय जनता पक्षाकडून निवडणूक लढवत दणदणीत यश मिळवले आहे. महानगरपालिकेच्या अर्ज भरण्याच्या प्रक्रिया राहुल नार्वेकर यांच्या सहभागामुळे तसेच काही उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी दमदाटी केल्याच्या आरोपामुळे चर्चेत आले होते. पण निवडणूक निकालात नार्वेकर यांनी तिन्ही जागा मोठ्या फरकाने जिंकल्यामुळे या भागातला त्यांचा धबधबा कायम असल्याचे दिसून आले आहे. राहुल नार्वेकर यांच्या भगिनी डॉ. गौरवी शिवलकर नार्वेकर यांना विजय मिळवला. भारतीय जनता पक्षाकडून उमेदवार निवडणूक लढवत असलेल्या डॉ. गौरवी शिवलकर यांना ६,१३१ मते मिळाली. शिवसेना ठाकरे गटाच्या रेहाना गफूर शेख यांना २१४० मते मिळाली. जनता दल सेक्युलरच्या सुषमा भगवान साळवी यांना ८६ तर अपक्ष उमेदवार डॉ. लोरा डिसूझा यांना ९४३ मते मिळाली. नोटाला ३२१ मते मिळाली. मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 226 मधून एडवोकेट मकरंद सुरेश नार्वेकर यांनी दणदणीत विजय मिळवला त्यांना १८०५८ मते मिळाली. नोटाला १४०४ मते मिळाली. २२५ प्रभागातून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या वहिनी हर्षिता अश्विन नार्वेकर यांनी दणदणीत विजय मिळवला. हर्षिता नार्वेकर यांना ११,३०७ मते मिळाली.

### मशाल विझली, इंजिनचा धूरही संपला
## प्रताप सरनाईकांचा प्रहार



■ **मुंबई** : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीची मतमोजणी आज सुरू आहे. निकालाचे कल स्पष्ट होत असतानाच राजकीय आरोप-प्रत्यारोपांना धार चढली आहे. शिवसेना (शिंदे गट) नेते आणि आमदार प्रताप सरनाईक यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यावर बोचऱ्या शब्दांत टीका केली आहे. "आता मशालीची ज्योत विझली असून मनसेच्या इंजिनचा धूरही संपला आहे," अशा शब्दांत त्यांनी ठाकरे बंधूंना लक्ष्य केले. एका वृत्तवाहिनीशी बोलताना प्रताप सरनाईक यांनी ठाकरे बंधूंच्या निवडणूक रणनीतीवर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले की, "राज्यात निवडणुकीचा एवढा मोठा रणसंग्राम सुरू असताना ठाकरे बंधूंनी केवळ शेवटचे तीन दिवस प्रचाराचे सोपस्कार पूर्ण केले. त्यांचे राजकारण केवळ मुंबई आणि ठाण्यापुरतेच मर्यादित आहे. महाराष्ट्रात या दोन शहरांव्यतिरिक्त इतर २७ महापालिका आहेत, पण ठाकरे बंधूंनी उर्वरित महाराष्ट्रातील जनतेला पूर्णपणे वाऱ्यावर सोडले होते." प्रताप सरनाईक यांनी ठाकरे बंधूंनी प्रचारात दाखवलेल्या 'गांभीर्या'वरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते पुढे म्हणाले, "केवळ शेवटचे तीन दिवस प्रचाराचा दिखावा करून आपण संपूर्ण महाराष्ट्र जिंकू शकतो, या भ्रमात ठाकरे बंधू होते. मात्र, आजच्या निकालातून त्यांचे हे स्वप्न भंग पावेल.

### पुणे महापालिका निवडणुकीत
# भाजपाचा 'क्लीन स्वीप'

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १६ :** पुणे महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ३७ मध्ये भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक विजय मिळवला आहे. या निकालाने राज्याचे माजी मंत्री तानाजी सावंत यांना मोठा राजकीय धक्का बसला असून, त्यांचा मुलगा आणि शिवसेनेचा (शिंदे गट) उमेदवार गिरीराज सावंत यांचा या निवडणुकीत पराभव झाला आहे. प्रभाग ३७ मध्ये भाजपने स्पष्ट विजय मिळवताना स्थानिक नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.



यादीत भाजपचे चार उमेदवार पुढे आले आहेत. या उमेदवारांमध्ये माजी उपमहापौर किशोर धनकवडे, वर्षा तापकीर, अरुण राजवाडे आणि तेजश्री बदक यांचा समावेश आहे. सर्व विजेते उमेदवार स्थानिक कार्यकर्ते आणि लोकप्रिय नेते आहेत, ज्यांनी स्थानिक जनतेसोबत त्यांचा मजबूत संवाद कायम ठेवला. त्यांचा विजय याच कारणामुळे शक्य झाला, असे मानले जात आहे.गिरीराज सावंत यांना शिवसेनेच्या (शिंदे गट) प्रमुख नेत्याच्या मुलाचे म्हणून एक मोठे पर्याय मिळाले होते, परंतु त्यांना मतदारांचा विश्वास मिळवण्यात अपयश आले. या प्रभागात मराठा समाजाचा पाठिंबा मिळवण्यासाठी त्यांनी खास रणनीती तयार केली होती. तरीदेखील, मतदारांनी भाजपच्या स्थानिक नेत्यांना पसंती दिली, ज्यांनी आपल्या कामाने आणि जनसंपर्कामुळे एक ठोस स्थान निर्माण केले आहे.

किशोर धनकवडे आणि वर्षा तापकीर यांच्यासारख्या अनुभवी नेत्यांचा विजय भाजपच्या ध्रुवीकरणाच्या धोरणाची आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या कष्टांची गती दर्शविते. या निकालामुळे भाजपच्या धनकवडी-आंबेगाव परिसरातील वर्चस्वाला एक नया आदर्श निर्माण झाला आहे.

त्याचबरोबर, भाजप आणि शिंदे गट यांच्यात असलेली महायुती असूनही, या प्रभागात भाजपने शिवसेनेच्या उमेदवाराला हरवून आपली ताकद दाखवली आहे.भाजपच्या विजयामुळे पुण्याच्या राजकीय वातावरणात एक नवा वळण आला आहे. अनेक राजकीय समीक्षक मानत आहेत की, भाजपने आपल्या जुन्या आणि अनुभवी कार्यकर्त्यांना संधी देत, या प्रकारच्या निवडणुकीत विजय मिळवून, स्थानिक राजकारणात आपली पकड आणखी मजबूत केली आहे.

तानाजी सावंत यांच्या कुटुंबाला या पराभवामुळे मोठा धक्का बसला असला तरी, पुण्यात भाजपच्या आगामी राजकीय रणनीतीसाठी या निकालाचे महत्त्व आहे. समाजातील विविध घटकांच्या प्रतिनिधींसाठी भाजपच्या कार्यकर्त्यांनी नेहमीच जनसंपर्काचे कार्य प्रभावीपणे पार पडले आहे, याचे परिणाम म्हणून हा विजय एक नवा मार्गदर्शक ठरू शकतो. आगामी काळात भाजप या भागातील राजकारणात अधिक सक्रीय राहील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

### संभाजीनगरात मतमोजणीस्थळी
## पोलिसांचा लाठीचार्ज

■ **वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. १६** छत्रपती संभाजीनगर येथील मतमोजणी केंद्रावर पोलिसांनी लाठीचार्ज केला आहे. त्यात सत्ताधारी शिवसेनेचे माजी महापौर विकास जैन जखमी झालेत. त्यांच्या हाताला जबर मार लागला आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त करत पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

राज्यात आज छत्रपती संभाजीनगरसह राज्यातील 29 महापालिकांच्या निवडणुकांची मतमोजणी सुरू आहे. सुरुवातीच्या कलामध्ये सत्ताधारी महायुती आघाडीवर असल्याचे चित्र आहे. छत्रपती संभाजीनगरमध्येही 4 ठिकाणी मतमोजणी सुरू आहे. या चारही ठिकाणी राजकीय पक्षांचे कार्यकर्ते व नागरिकांनी निकाल ऐकण्यासाठी गर्दी केली आहे. त्यातच उस्मानपुरा येथील शासकीय अभियांत्रिकी मतमोजणी केंद्रावर मतमोजणी सुरू होण्यापूर्वी पोलिसांनी गर्दी पांगवण्यासाठी तुफान लाठीमार केला. त्यात शिंदे गटाचे नेते तथा शहराचे माजी महापौर विकास जैन जबर जखमी झाले.

या घटनेचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यात पोलिस कर्मचारी नागरिकांना घेरून काठ्यांनी मारहाण करताना दिसून येत आहे. एक व्यक्ती पोलिसांच्या मारापासून वाचण्यासाठी झाडाजवळ बसला असताना पोलिस त्याच्यावरही काठ्यांचा प्रहार करताना दिसून येत आहेत. केवळ आत जाण्याच्या विनंतीवरून ही मारहाण करण्यात आल्याची माहिती आहे. शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.

संजय शिरसाट म्हणाले, आज मतमोजणी आहे. मतदान नाही. या लोकांना कळत कसे नाही. त्यांना काही सेन्स नाही का? जखमी झालेले कार्यकर्ते आमचे प्रतिनिधी आहेत. त्यांच्याकडे ओळखपत्र आहे. त्यांना जनावरासारखे मारले. यांना कसली मस्ती आहे. एक अधिकारी इथे दिसत नाही. यांच्यावर तातडीने कारवाई झाली पाहिजे. मी मुख्यमंत्र्यांशी बोलणार आहे. या पद्धतीने मारहाण होत असेल तर हा पोलिसांचा मस्तवालपणा आहे. ही मस्ती कुठे तरी उतरली पाहिजे. हे माजी महापौर आहेत. त्यांचा हात मोडला. ते मतदान करायला जात होते का? हा मतमोजणीचा टाईम आहे ना.

## सदा सरवणकरांच्या मुलाचा पराभव



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :** मुंबई महापालिकेतील प्रभादेवी वॉर्ड क्रमांक 194 मध्ये मोठा उलटफेर झाला आहे. याठिकाणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे उमेदवार समाधान सरवणकर यांचा पराभव झाला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार निशिकांत शिंदे यांनी अतितटीच्या लढतीत त्यांचा पराभव झाला आहे. विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाच्या महेश सावंत यांनी सदा सरवणकर यांचा पराभव केला होता. त्यानंतर आता महापालिका निवडणुकीतही ठाकरे गटाने त्यांच्या मुलाचा पराभव केला आहे. यामुळे सदा सरवणकर यांना दुहेरी झटका सहन करावा लागला आहे.

दादर - प्रभादेवीतील वॉर्ड 194 मध्ये ठाकरे व शिंदे गटात अत्यंत हायव्होल्टेज लढत होती. शिवसेनेतील फुटीनंतर हा वॉर्ड शिंदे गट व ठाकरे गटातील संघर्षाचा केंद्रबिंदू ठरला होता. आजी आमदार महेश सावंत यांनी पुन्हा एकदा कधी काळचे आपले गुरू माजी आमदार सदा सरवणकर यांच्याविरोधात शड्डू ठोकला.

## प्रतिस्पर्धी उमेदवाराला पाठिंबा दिल्याने महिलेसह चौघांना मारहाण

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १६ :** पुणे जिल्ह्यातील बाणेर परिसरात प्रतिस्पर्धी उमेदवाराला पाठिंबा दिल्याच्या रागातून एका महिलेसह तिच्या कुटुंबीयांना मारहाण करण्यात आली आहे. टोळक्याने महिलेसह चौघांना बेदम मारहाण केल्याची ही घटना घडली असून, या प्रकरणी बाणेर पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

कल्याणी रामदास धनकुडे (वय ३८, रा. धनशीला बंगला, बाणेर) यांनी बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, प्रणित प्रमोद निम्हण, प्रणय प्रमोद निम्हण, प्रसन्न रामभाऊ निम्हण, संदीप नामदेव निम्हण आणि परवेज शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याणी धनकुडे यांच्या नणंद सरला बाबुराव चांदेरे यांचे पती बाणेरमधून निवडणूक लढवत आहेत. धनकुडे कुटुंबीयांनी चांदेरे यांना पाठिंबा दिल्याने निम्हण कुटुंबीय संतप्त झाले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ जानेवारी रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास कल्याणी धनकुडे त्यांच्या बंगल्याच्या परिसरात थांबल्या होत्या. मतदान प्रक्रिया सुरू असताना आरोपी निम्हण हे धनकुडे यांच्या बंगल्यात शिरले. त्यांनी धनकुडे यांच्या मोटारीवरील चालक सचिन उत्तम फासगे यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली, ज्यात फासगे जखमी झाले. यानंतर आरोपींनी कल्याणी यांना शिवीगाळ करत काठीने मारहाण केली. कल्याणी यांना वाचवण्यासाठी आलेल्या नवनाथ देशमुख यांनाही आरोपींनी काठी आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. कल्याणी यांच्या नातेवाईक सायली निलेश शिंदे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी त्यांना धक्काबुक्की केली. आरोपी प्रणित निम्हण याने 'निवडणूक झाल्यानंतर तुम्हाला बघून घेतो,' अशी धमकी दिल्याचे कल्याणी धनकुडे यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

## महाराष्ट्रातून शिंदेंची शिवसेना संपवण्याचे भाजपचे लक्ष



■ **वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. १६ :** राज्यातील 29 महापालिका निवडणुकांची मतमोजणी पार पडत असून बहुतांश भागात भाजप व महायुतीला बहुमत मिळत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे ठाकरेंच्या बालेकिल्ल्यात, अर्थात मुंबईतही भाजपला स्पष्ट बहुमत असल्याचे दिसून येत आहे. एकंदरीतच या निवडणुकीवर आता एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

इम्तियाज जलील म्हणाल्या, भारतीय जनता पार्टीचें एक लक्ष होते, पूर्ण महाराष्ट्रात त्यांना शिवसेनेला संपवायचे होते. एकनाथ शिंदे साहेबांची शिवसेना संपवायची होती. म्हणून त्यांनी ऐनवेळी जे अलायन्स ब्रेक केले आणि त्यात ते यशस्वी झाले आहे. आता शिवसेना आमच्या मागे आहे. त्यांचा एक पालकमंत्री, आमदार आणि खासदार असून काय उपटले? असा खोचक सवाल त्यांनी उपस्थित केला.

पुढे बोलताना इम्तियाज जलील म्हणाले, एमआयएमच्या बाबतीत सभेत बोलत होते, एमआयएम जातीवादी पक्ष आहे, आम्ही सगळ्या समाजातल्या लोकांना निवडून आणले आहे. हे सर्वसामान्य लोकांचे यश आहे. शहराचे विकास करण्यासाठी आम्ही नक्कीच भाजपचे समर्थन करणार.

इम्तियाज जलील म्हणाले, इतके मोठे यश आत्तापर्यंत एमआयएमला मिळाले नव्हते, जितके आज मिळाले आहे. भिवंडी सारख्या ठिकाणी 4 जागा जिंकलो आहोत, मुंब्रा सारख्या ठिकाणी आम्ही 5 जागा जिंकलो आहोत. धुळ्यात आत्तापर्यंत आम्ही 8 जागा जिंकले आहेत, बहुतेक तिथे आमचे 15 सीट येतील, अमरावतीमध्ये 9 सीट, अकोलामध्ये 3, जालनामध्ये 2, अहमदनगरमध्ये 2, नांदेडमध्ये आत्तापर्यंत 6 सीट जिंकल्या आहेत, तिथे आम्ही 10 पर्यंत पोहोचू शकतो.

### पुण्यात 'हाई वोल्टेज ड्रामा' मत चोरल्याचा आरोप
## रूपाली ठोंबरे पाटील आक्रमक



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १६ :** 2026 पुण्यातील प्रभाग क्रमांक २५ स्थित न्यू इंग्लिश स्कूल मतमोजणी केंद्रावर गोंधळ निर्माण झाल्याने तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे उमेदवार रूपाली ठोंबरे पाटील यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. मतमोजणीच्या दरम्यान, त्या थेट जाळीवर चढून ईव्हीएम मशीनच्या जवळ उडी मारण्याचा प्रयत्न करत होत्या.

रूपाली ठोंबरे पाटील यांनी मतमोजणी प्रक्रियेतील गोंधळ आणि त्यात होणाऱ्या घोटाळ्याचा आरोप केला. त्यानंतर पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला, परंतु तरीही त्या आत प्रवेश करण्यासाठी एक पाऊल पुढे जात होत्या. पोलीस आणि निवडणूक आयोगाच्या कारवाईवरून त्यांची नाराजी व्यक्त झाली. त्याचबरोबर, त्यांनी भाजपवर मत चोरी केल्याचा आरोप केला आणि यामध्ये पोलिसांची, निवडणूक आयोगाची आणि भाजपची भागीदारी असल्याचा दावा केला.

रूपाली ठोंबरे पाटील 2026 यांच्या आरोपानुसार, मशीन बदलण्यात आले असून, एकाच मशीनची आकडेवारी आणि प्रत्यक्ष मतमोजणी करणाऱ्या मशीनच्या आकडेवारीत तफावत दिसून आली. हेच कारण असताना त्या आक्रमक झाल्या होत्या. "आम्ही हा विजय भाजपला भिकेत दिला आहे. भाजपने मत चोरी केली आहे आणि त्यांच्या सोबत पोलिस आणि निवडणूक आयोग आहे," असे तीव्र आरोप रूपाली ठोंबरे पाटील यांनी केलं.

मतमोजणी थांबवण्याचा निर्णय घेतल्यानंतर, त्यांनी आरोप केला की पोलिसांकडून त्यांच्यावर दबाव आणला जात होता आणि ते एकप्रकारे लोकशाहीच्या विरोधात कार्य करत आहेत. "ज्याचं काम उत्तरं देणं होतं, त्याऐवजी पोलिसांनी उत्तरं दिली. लोकशाहीचा गळा दाबला जात आहे," अशी प्रतिक्रिया त्यावेळी पाटील यांनी व्यक्त केली. या घटनेने पुण्यातील मतमोजणी प्रक्रियेला तात्पुरता गोंधळ निर्माण केला.

## मंत्री संजय शिरसाट यांची मुलगी हर्षदा विजयी

■ **वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. १६ :** मराठवाड्यातील सर्वात मोठी महापालिका असणाऱ्या छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या निवडणुकांचे निकाल वेगाने हाती येत आहेत. त्यात सत्ताधारी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या कन्या हर्षदा शिरसाट यांचा विजय झाला आहे. शिरसाट यांचा मुलगा सिद्धांत शिरसाटही आघाडीवर आहे. संभाजीनगरात सध्या भाजप सर्वाधिक जागा जिंकून आघाडीवर असून, शिंदे गट दुसऱ्या क्रमांकावर आहे.

छत्रपती संभाजीनगर महापालिकेसाठी भाजपचे 97, शिंदे गटाचे 92, ठाकरे गटाचे 97, काँग्रेसचे 77, राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे 77 व एमआयएमचे 48 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. यात राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचा मुलगा सिद्धांत शिरसाट हा प्रभाग क्रमांक 29 अ मधून निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

## शिवसेना ठाकरे गटाचे रमाकांत रहाटे यांचा दणदणीत विजयी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग २०८ मधून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार रमाकांत रहाटे यांचा दणदणीत विजय झाला. रमाकांत रहाटे यांना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) ११,६५३ मते मिळाली. शिवसेना शिंदे गटाचे विजय लिपारे यांना ७,४६५ मते मिळाली. इंडियन नॅशनल काँग्रेसचे सतीश खांडगे ४,३३५ मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचें मंगेश बनसोड यांना १००९ मध्ये तर अपक्ष अरुणा जैतपाळ यांना ११५ मते मिळाली. नोटाला ४०० मते मिळाली.

शिवसेना (उ.बा.ठा.) गटाचे रमाकांत रहाटे रमाकांत यांनी एकूण ११,६५३ मते मिळवून त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी, शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे विजय (दाऊ) लिपारे यांचा पराभव केला. लिपारे यांना ७,४६५ मते मिळाली, म्हणजेच रहाटे यांनी सुमारे ४,१८८ मतांच्या फरकाने दणदणीत विजय नोंदवला आहे. २४,९७७ एकूण वैध मते ठरली.

## लढाई अजून संपली नाही



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :** राज्यातील 29 महापालिका निवडणुकांचे निकाल समोर येत आहेत. मुंबईत भाजप आणि शिवसेना युती आघाडीवर असल्याचे दिसून येत आहे. शिवसेना ठाकरे गट आणि मनसेचे देखील बऱ्यापैकी जागा येताना दिसत आहेत. एकूणच येथील निवडणूक ही अटीतटीची दिसून येत आहे. यावर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

संजय राऊत म्हणाले, दुपारी 3 नंतर जे निकाल यायला सुरुवात झाली त्यातले 80-85 टक्के निकाल हे शिवसेनेच्या विजयाच्या आहेत. आम्ही अनेक ठिकाणी आघाडीवर आहोत. नक्कीच अटीतटीची लढत आहे. काटे की टक्कर आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सुद्धा उमेदवार विजयी होत आहेत. त्यांचाही आकडा वाढत आहे. अशा वेळेला तुम्ही आव्हाणांची भाषा करत आहात. मुंबईची लढाई इतर महापालिकांपेक्षा वेगळी आहे, इथली लढाई आम्ही शेवटच्या श्वासापर्यंत लढणार. अजून लढाई संपली नाही. पूर्ण निकाल हाती आल्यानंतर मग आपण बोलू.

पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, शिवसेना फोडून हा विजय ते मिळवत आहेत. शिवसेना फुटली नसती तर 120-15 जागांवर जिंकली असती आणि भाजपचा खेळ 50-60 मध्ये संपला असता. मराठी माणूस हा आजही ठाकरेंच्याच मागे आहे. मुंबईवर महापौर बसवण्यासाठी शिवसेना फोडली. महाराष्ट्राचे मराठी माणसाच्या एकजुटीला सुरुंग लावला. पण मराठी माणूस हा ठाकरेंच्याच पाठीशी आहे, हे तुम्हाला निकालानंतर दिसेल, असा विश्वास राऊत यांनी व्यक्त केला.

एमआयएमचे 6 नगरसेवक निवडून आले आहेत, यावर प्रतिक्रिया देताना संजय राऊत म्हणाले, एमआयएमला भाजपने ताकद दिली. काही मुस्लिमांची मते आमच्याकडे वळणार असते, तर ते वळू नयेत म्हणून यांनी पायघड्या घातल्या. तसेच पुणे सारख्या ठिकाणी सुद्धा भाजप आघाडीवर आहे, यावर बोलताना राऊत म्हणाले, भाजपच्या हातात जर फ्रांसचा जरी निवडणूक आयोग असता, तर हे तिकडे पण जिंकले असते. त्यांच्या विजायला आम्ही निर्भीड विजय मानत नाही. निवडणूक आयोग नेमताना विरोधी पक्षाला विश्वासात घ्यावे, पण केंद्रात नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस हे अशा प्रकारचे लोकशाहीला रुचेल पचेल असे कोणतेही सत्कार्य करणार नाही, असे राऊत म्हणाले.

# संभाजीनगरमध्ये भाजपच ठरला मोठा भाऊ
### युती तोडणाऱ्या शिवसेनेला जबर फटका : अंबादास दानवेंना मोठा धक्का

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या निवडणुकीकडे अवघ्या राज्याचं लक्ष लागून राहिलं होतं. 60 टक्के मतदान झालेल्या या निवडणुकीत मतदारांनी दिलेला कौल स्पष्टपणे भाजपच्या बाजूने झुकलेला दिसून आला आहे. शिवसेनेसोबत युती न करता स्वबळावर लढण्याचा निर्णय भाजपसाठी फायदेशीर ठरला, तर हाच निर्णय शिंदे गटाच्या शिवसेनेसाठी अंगलट आला आहे. निकालांचे चित्र स्पष्ट होत असताना भाजप सर्वाधिक जागांवर आघाडी घेतली असून महापालिकेत शतप्रतिशत सत्तेपर्यंत मजल मारली आहे. याउलट, आम्हीच मोठा भाऊ असा दावा करणाऱ्या शिंदेंच्या शिवसेनेला आता लहान भावाच्या भूमिकेत राहावे लागणार आहे.



या निवडणुकीत विशेष बाब म्हणजे भाजप, शिंदे गटाची शिवसेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (दोन्ही गट), एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडी-सर्वच पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता. कोणतीही औपचारिक युती नसताना देखील भाजपने सर्वाधिक स्ट्राइक रेट राखला. बंडखोरी, अंतर्गत नाराजी आणि तिकीट वाटपावरील असंतोष असूनही भाजपने मतदारांचा विश्वास मिळवला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टॉक शो आणि प्रचारसभांमधून विकासकामांचा लेखाजोखा मांडत भगव्याची शान राखा असं थेट आवाहन केलं होतं, त्याला संभाजीनगरच्या मतदारांनी प्रतिसाद दिल्याचं निकालातून दिसून आलं.

याउलट, शिंदे गटाच्या शिवसेनेला स्वबळाचा निर्णय महागात पडला. उमेदवार निवडीत मोठ्या प्रमाणावर नेत्यांच्या मुलांना आणि नातेवाईकांना तिकीट देण्यात आल्याने पक्षांतर्गत नाराजी वाढली. पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आपल्या मुलगा सिद्धांत आणि मुलगी हर्षदा यांना उमेदवारी दिली होती. वर्षानुवर्षे नगरसेवक, माजी महापौर राहिलेल्यांना पुन्हा संधी देताना नव्या आणि इतर पक्षांतून आलेल्या कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला. परिणामी, संजय शिरसाट स्वतः आपल्या मुलगा-मुलीच्या प्रभागांमध्येच अडकून पडले आणि संपूर्ण शहरात पक्षाला अपेक्षित ताकद लावता आली नाही. याचा थेट परिणाम शिवसेनेच्या जागांवर झाला असून भाजपच्या तुलनेत सेनेची पिछेहाट स्पष्ट दिसते.

दरम्यान, एमआयएमने अंतर्गत वाद, उमेदवारी वाटपातील आरोप आणि इम्तियाज जलील यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवरही आपली पारंपरिक वोटबँक मोठ्या प्रमाणात टिकवून ठेवली आहे. बावीस माजी नगरसेवकांची तिकीटं कापण्याचा निर्णय पक्षासाठी काही तोट्याचा ठरला नाही. एमआयएमला केवळ एका जागेचा फटका बसताना दिसतो आहे.

मागील महापालिकेत 25 नगरसेवकांसह विरोधी पक्षात बसलेली एमआयएम यावेळीही जवळपास त्याच भूमिकेत राहणार आहे. मोठ्या प्रमाणावर नाराजी असतानाही नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचा इम्तियाज जलील यांचा प्रयोग यशस्वी ठरल्याचे राजकीय निरीक्षक मानतात. यात पक्षप्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी गल्लीबोळात फिरून केलेला प्रचारही निर्णायक ठरला.

## एआयएमआयएमचा तीन जागांवर विजय

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १६ :** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत असदुद्दीन ओवैसी यांच्या नेतृत्वाखालील एआयएमआयएमने प्रभावी प्रवेश करत राजकीय वतुर्ळात लक्ष वेधून घेतले आहे. बीएमसी निवडणुकीत एआयएमआयएमने सर्वांना आश्चर्यचकित करत मुंबईतील तीन वॉर्डमध्ये दणदणीत विजय मिळवला आहे. वॉर्ड क्रमांक १३५ मधून इरशाद खान, वॉर्ड क्रमांक १३४ मधून महजबीन अतीक अहमद आणि वॉर्ड क्रमांक १४५ मधून खैरुनिसा हुसेन यांनी विजय संपादन केला आहे. महापालिका राजकारणात एआयएमआयएमची ठळक उपस्थिती निर्माण झाली असून, बीएमसीत एआयएमआयएमची ही यशस्वी एंट्री आगामी राजकीय समीकरणे बदलणारी ठरते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



# भाजपला सत्तेसाठी मित्रपक्षांच्या कुबड्यांची गरज!

राष्ट्रवादी कॉंग्रेस ला फक्त 10 टक्के जागा | राणा दाम्पत्यांची योजना अत्यंत यशस्वी | सत्तेसाठी युवा स्वाभिमान ठरणार 'किंगमेकर'













**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.16 )- अमरावती महापालिकेच्या निकालांनी शहरातील राजकारणाला पूर्णतः नवे वळण दिले आहे. 'स्वबळावर सत्ता' स्थापनेचा भाजपचा दावा प्रत्यक्षात उतरू शकला नाही. सर्वाधिक जागा मिळवूनही बहुमताचा आकडा गाठण्यात अपयश आल्याने भाजपला आता इतर पक्षांच्या कुबड्या घेवूनच सत्तेचे गणित मांडावे लागणार आहे. या बदललेल्या राजकीय चित्रात राणा दाम्पत्यांची योजना अत्यंत यशस्वी ठरली. त्यामूळे युवा स्वाभिमानी पक्षाचे प्रमुख आमदार रवी राणा हे सर्वात प्रभावी केंद्रबिंदू ठरले आहेत. निकालानंतरची परिस्थिती पाहता अमरावतीच्या सत्ताकारणाची चावी आता त्यांच्या हातात गेली असल्याचे स्पष्ट होत आहे.**

निकालाअंती भाजपला 25 जागांवर समाधान मानावे लागले, तर बहुमतासाठी आवश्यक असलेला 44 चा आकडा त्यांच्यासाठी आवाक्याबाहेरच राहिला. याउलट युवा स्वाभिमानी पक्षाने 15 जागा जिंकून राजकीय वर्तुळाला धक्का दिला. मागील निवडणुकीत केवळ तीन जागांवर असलेला पक्ष इतक्या मोठ्या संख्येने विजयी होणे ही शहरातील राजकारणातील मोठी घडामोड मानली जात आहे. या यशामुळे रवी राणा यांनी केवळ आपली ताकद सिद्ध केली नाही, तर भाजपच्या वर्चस्वालाही थेट आव्हान दिले.

प्रचारादरम्यान खासदार नवनीत राणा यांनी युवा स्वाभिमानी पक्षाच्या उमेदवारांना उघड पाठिंबा दिल्याने भाजपची अडचण अधिकच वाढली. काही प्रभागांत ही भूमिका निर्णायक ठरली, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्यामुळे भाजपला विरोधकांपेक्षा आपल्या माजी मित्रपक्षाकडूनच अधिक धक्का बसल्याचे चित्र निर्माण झाले.

## महापालिकेचे प्रत्यक्ष कारभारी बनतील राणा

महानगरपालिकेतील सत्ताकारणात आता निर्णायक भूमिका आमदार रवी राणा यांच्याकडे आली आहे. महापौरपदासाठी भाजपला पाठिंबा देण्याची घोषणा करून त्यांनी सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा केला आहे. भाजप, युवा स्वाभिमानी पक्ष आणि शिंदे गट एकत्र आल्यास बहुमताचा आकडा सहज गाठता येणार आहे. राष्ट्रवादीला बाजूला ठेवूनही महायुतीच्या इतर घटकांच्या बळावर सत्ता स्थापन होऊ शकते, हे स्पष्ट झाले आहे. मात्र, केवळ पाठिंबा देऊन थांबणार नसून, स्थायी समितीचे सभापतीपद आणि आर्थिक अधिकार आपल्या गटाकडे ठेवण्यावर रवी राणा आग्रही राहतील, अशी जोरदार चर्चा आहे. त्यामुळे प्रत्यक्ष कारभाराची सूत्रे त्यांच्या हातातच राहणार, असे चित्र आहे.

## कॉँग्रेस ने टीकवले अस्तित्व

दरम्यान, राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार गट) ने 11 जागा जिंकून स्वतःला सत्तेसाठी महत्त्वाचा भागीदार बनवले आहे. कॉँग्रेसने 15 जागांसह आपली उपस्थिती ठसठशीत ठेवली, तर एमआयएमने 12 जागा जिंकून शहरातील अल्पसंख्याक राजकारणात आपली ताकद दाखवून दिली. बसपा, शिवसेना शिंदे गट, उद्धव ठाकरे गट आणि वंचित आघाडी यांनीही आपापली मर्यादित पण महत्त्वाची उपस्थिती नोंदवली आहे.

## असे आहे सत्ता स्थापनेचे चित्र

सत्ता स्थापनेचे संभाव्य चित्र पाहता भाजप आणि युवा स्वाभिमानी पक्ष एकत्र आल्यास 40 नगरसेवकांचे संख्याबळ उभे राहू शकते. यामध्ये अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी कॉँग्रेसचे 11 नगरसेवक सहभागी झाल्यास सत्ता स्थापन करणे शक्य होईल. मात्र अशी सत्ता भाजपच्या नेतृत्वाखाली असली तरी तिचा तोल रवी राणा यांच्या भूमिकेवर अवलंबून राहणार आहे. त्यामुळे भाजपला पुढील पाच वर्षे स्वबळावर निर्णय घेण्याऐवजी समन्वय आणि तडजोडींचे राजकारण करावे लागेल.

## युतीतील तणाव महत्वाचा घटक

या निकालामागे भाजप आणि युवा स्वाभिमानी पक्षातील तणाव महत्त्वाचा घटक ठरला. सुरुवातीला दोन्ही पक्षांत युती झाली होती. मात्र जागावाटपावरून मतभेद वाढले. भाजपने कमी जागा देऊ केल्याने असमाधान व्यक्त करत रवी राणा यांनी मोठ्या संख्येने उमेदवार उभे केले. त्यामुळे अनेक प्रभागांत थेट भाजपविरोधी लढत झाली. याचा परिणाम म्हणून भाजपची मते विभागली गेली आणि काही जागांवर त्यांना पराभव पत्करावा लागला.

## विलास इंगोलेंच्या लोकप्रियतेचे सातव्यांदा दर्शन

बुधवाराङ्कजवाहर गेट प्रभाग 14 मध्ये कॉँग्रेसचा झेंडा पुन्हा एकदा उंचावला. ज्येष्ठ नेते विलास इंगोले यांनी सातत्यपूर्ण लोकप्रियतेचे दर्शन घडवत सलग सातवे यश मिळवले. त्यांनी जवळच्या प्रतिस्पर्ध्यांना मोठ्या फरकाने मागे टाकले. एकूण 661 उमेदवारांत त्यांना सर्वाधिक मते मिळाली, ज्यामुळे प्रभागातील त्यांचे नेतृत्व आणि संघटन कौशल्य ठळक झाले. मतदारांनी विश्वास कायम ठेवत स्थिर जनाधाराचे प्रतिबिंब दाखवले. प्रचारात शिस्त आणि कामगिरी निर्णायक ठरली, असे निरीक्षकांचे मत आहे.

## अमरावती महापालिका निवडणूक 2026

**अंतिम स्थिती**

भाजप - 25
शिवसेना (शिंदे) - 03
युवा स्वाभिमान पक्ष - 15
राष्ट्रवादी कॉँग्रेस (अ. प.) -11
कॉँग्रेस - 15
शिवसेना (उद्धव ठाकरे गट) - 02
बसपा - 03
एआयएमआयएम - 12
वंचित - 01

## मुख्यमंत्र्यांच्या मामेभावाचा पराभव

महापालिका निवडणुकीत सत्ताधारी गटाला धक्का देणारे निकाल समोर आले. बुधवाराङ्कजवाहर गेट प्रभागात कॉँग्रेसचे डॉ. संजय शिरभाते यांनी 5645 मते मिळवत मुख्यमंत्र्यांचे मामेभाऊ विवेक कलोतींचा 4726 मतांनी पिछाडीवर टाकत विजय मिळवला. तसेच साईनगर प्रभागात युवा स्वाभिमान पक्षाचे सचिन भेंडे यांनी 5058 मते मिळवून महापालिकेतील भाजपचे माजी पक्षनेते तुषार भारतीय यांचा 4179 मतांनी पराभव केला. या दोन्ही निकालांनी राजकीय समीकरणे बदलली. शहरात चर्चेला उधाण आले असून मतदारांचा कल बदलल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. आगामी राजकारणावर याचा परिणाम दिसणार आहे.

## प्रस्थापितांना हादरा

या निवडणुकीत मतदारांनी महापालिकेच्या राजकारणातील काही दिग्गजांना पराभवाचा हादरा दिला. माजी महापौर वंदना कंगाले, माजी उपमहापौर चेतन गावंडे व कुसुम साहु, भाजपचे माजी गटनेते तुषार भारतीय, स्थायी समितीचे माजी सभापती विवेक कलोती, राष्ट्रवादीचे प्रशांत डवरे व प्रकाश बनसोड यासह काही ज्येष्ठ माजी नगरसेवकांचा या निवडणुकीत पराभव झाला. माजी महापौर विलास इंगोले, संजय नरवणे व चेतन गावंडे, माजी उपमहापोर शेख जफर शेख जब्बार, माजी स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, कॉंग्रेसचे शहर अध्यक्ष बबलु शेखावत, माजी नगरसेवक प्रशांत वानखडे, डॉ. राजेंद्र तायडे, मंजुषा जाधव यांनी विजय मिळवून आपले अस्तित्व कायम राखले.

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव | नाव | पक्ष |
|---|---|---|---|
| 1 | शेगांव - रहाटगांव | कल्याणी आकाश तायडे | भारतीय जनता पार्टी |
| 1 | शेगांव - रहाटगांव | चंद उर्फ चंद्रकांत ए. खेडकर | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| 1 | शेगांव - रहाटगांव | वंदना पदीप मडघे | भारतीय जनता पार्टी |
| 1 | शेगांव - रहाटगांव | गुड्डु उर्फ प्रशांत धर्माळे | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| 2 | संत गाडगेबाबा - पि.डी.एस.सी. | विनोद गणेश तानवैस | भारतीय जनता पार्टी |
| 2 | संत गाडगेबाबा - पि.डी.एस.सी. | मिनल योगेश सवाई | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| 2 | संत गाडगेबाबा - पि.डी.एस.सी. | सुरेखा दिगंबर लुंगारे | भारतीय जनता पार्टी |
| 2 | संत गाडगेबाबा - पि.डी.एस.सी. | प्रमोद सुधाकर महल्ले | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| 3 | नवसारी | अनिता जितेंद्र काळे | भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस |
| 3 | नवसारी | प्रशांत श्रीधर महल्ले | भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस |
| 3 | नवसारी | लुबना तनवीर सै. मखदुम | भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस |
| 3 | नवसारी | ऋषीकेश संतोष देशमुख | भारतीय जनता पार्टी |
| 4 | जमील कॉलनी - लालखडी | अहेमद शाह इकबाल शाह | एआयएमआयएम |
| 4 | जमील कॉलनी - लालखडी | फरहा नाज सय्यद मीर अहद अली | एआयएमआयएम |
| 4 | जमील कॉलनी - लालखडी | कुबरा बानो करामत अली | एआयएमआयएम |
| 4 | जमील कॉलनी - लालखडी | सलाहुद्दीन करामोद्दीन | एआयएमआयएम |
| 5 | महेन्द्र कॉलनी - नवीन कॉटन | लोणारे सुनिता शरव | भारतीय जनता पार्टी |
| 5 | महेंद्र कॉलनी नवीन कॉटन मार्केट | ठाकरे माधुरी सुहास | भारतीय जनता पार्टी |
| 5 | महेंद्र कॉलनी- नवीन कॉटन मार्केट | राजश्री राजेन्द्र जटाळे | भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस |
| 5 | महेंद्र कॉलनी- नवीन कॉटन मार्केट | धिरज हिवसे | भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस |
| 6 | विलास नगर-मोरबाग-गवळीपुरा | नरवणे संजय सत्तप्पा | भारतीय जनता पार्टी |
| 6 | विलास नगर-मोरबाग-गवळीपुरा | रेखा हातबराव तायवाडे | शिवसेना (उबाठा) |
| 6 | विलास नगर-मोरबाग-गवळीपुरा | पुजा कौषीक अग्रवाल | भारतीय जनता पार्टी |
| 6 | विलास नगर-मोरवाग-गवळीपुरा | दीपक किसनलाल साहु (सम्राट) | युवा स्वाभीमान पार्टी |
| 6 | जवाहर स्टेडियम | सोनाली सचिन नाईक | भारतीय जनता पार्टी |
| 7 | जवाहर स्टेडियम | मनिष बजाज | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| 7 | जवाहर स्टेडियम | लुल्ला स्नेहा आशिष | शिवसेना |
| 7 | जवाहर स्टेडियम | तेजवानी श्रीचंद लक्ष्मणदास | भारतीय जनता पार्टी |
| 8 | जोग स्टेडियम - चपराशी पुरा | मालता संतोष गवई | भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस |
| 8 | जोग स्टेडियम - चपराशी पुरा | अर्चना संजय आत्राम | भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस |
| 8 | जोग स्टेडियम - चपराशी पुरा | अस्मा फिरोज खान | भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस |
| 8 | जोग स्टेडियम - चपराशी पुरा | बबलु शेखावत | भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस |
| 9 | एस.आर.पी.एफ. वडाळी | विक्की उर्फ विशाल वानखडे | भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस |
| 9 | एस.आर.पी.एफ. वडाळी | | |
| 9 | एस.आर.पी.एफ. वडाळी | | उर्वरित उद्याच्या अंकात |

# राष्ट्रवादीवर अखेर विरोधी बाकावर बसण्याची वेळ!

■ दैनिक महासागरची बातमी ठरली खरी

■ अमरावतीकरांनी खोडके दाम्पत्यांना नाकारले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.16 )-** महानगर पालिकेची सत्ता हातात घेण्याच्या महत्वकांक्षेने जय्यत तयारीला लागलेल्या आ.संजय खोडके व सुलभा खोडके दाम्पत्याला मोठ्या अपयशाला समोरे जावे लागले. कारण अमरावतीकरांनी त्यांना नाकारले, ज्याचा फटका काही निवडून येणाऱ्या उमेदवारांना सहन करावा लागला. दैनिक महासागर ने 11 जानेवारीच्या अंकात याबाबत भाष्य केले होते.




नवनित राणांमूळे पुर्वीपासूनच भाजपशी युती करणार नसल्याची घोषणा राष्ट्रवादी कॉँग्रेस(अजित पवार) गटाचे आमदार संजय खोडके यांनी केली होती. त्यामूळे ते एकटेच जोमाने तयारीलाही लागले होते. त्यांनी निवडणूकीच्या तोंडावर पक्षात अनेकांचे आगमन व अनेकांची एक्जीट केली होती. अतिआत्मविश्वास बाळगत असलेले संजय खोडकेंना तिकीट नाकारताना आपल्या कार्यकर्त्यांला दूखवू नये याचेही भान अनेक ठिकाणी राहिले नाही. गुंडगिरी, सट्टेबाजी करणाऱ्या लोकांना तिकीट देवून आपण साम, दाम, दंड, भेदाने सत्ता काबीज करु, असे खोडकेंना वाटत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची रेकॉर्ड ब्रेक 'विश्वास सभा' प्रतिस्पर्ध्यांना अवाक करणारी जरी ठरली, तरी ती नुसतं 'पोकळ बांबू' प्रमाणे होती, हे निकालाअंती सिध्द झाले. राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या बाबतीत आमदार संजय खोडके आणि सुलभा खोडके यांनी आपल्या उमेदवारांसाठी जोरदार प्रयत्न केले. प्रचार, बैठका आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून वातावरण तयार केले. वारेमाप खर्च खोडकेंनी या निवडणूकीमध्ये केला. परंतू त्यांना सत्ता काबीज करता आली नाही. 87 पैकी फक्त 10 जागांवर त्यांना यश आले. इतक्या जागा ते सहज घरी बसूनही मिळवू शकले असते. एकंदरीत दोन आमदारकी हातात असून, पाण्यासारखा पैसा ओतलेला असताना जनतेने मात्र त्यांना धडा शिकविला,त्यामूळे आत्मपरीक्षण करण्याची वेळ आता त्यांच्यावर आली आहे. अमरावतीच्या राजकारणात आगामी काळात समीकरणे बदलण्याची चिन्हे या निकालांतून स्पष्टपणे दिसून येत आहेत.

# मतगणनेवेळी नवसारी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये कडक पोलिस बंदोबस्त



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 16 )** - मनपा निवडणुकीसाठी मतदानानंतर सर्व ईव्हीएम मशिन्स नवसारी मार्गावरील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सुरक्षित ठेवण्यात आल्या होत्या. आज सकाळी दहा वाजल्यापासून या मशिन्सची मतगणना सुरू झाली.

मतगणनेच्या पार्श्वभूमीवर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या चारही बाजूंनी कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गतकालपासूनच प्रभागांच्या ईव्हीएम मशिन्स पोहोचू लागल्यावर पोलिसांनी सुरक्षा अधिक घट्ट केली. सकाळपासून मतदात्यांची गर्दी सुरू झाल्यावर अमरावती शहर पोलिसांनी परिसरात सुरक्षा आणि बंदोबस्त बळकट केला. नवसारी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सकडे येणाऱ्या मुख्य मार्गांवर बैरिकेट्स लावून वाहतूक पर्यायी मार्गांकडे वळवण्यात आली. तसेच परिसरात येणाऱ्या वाहनांना आधीच थांबवण्यात आले. शहर पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या नेतृत्वाखाली तीन पोलिस उपायुक्त आणि पाच सहाय्यक पोलिस आयुक्तांना मतगणना स्थळी बंदोबस्ताची कमान सोपवण्यात आली. या सुरक्षा व्यवस्थेत 18 पीआय, 74 एपीआय व



पीएसआयसह सुमारे 700-800 पोलिस कर्मचाऱ्यांची तैनाती करण्यात आली. यापैकी 200 पोलिस कर्मचाऱ्यांना मतगणना स्थळाच्या आत, 300 बाहेर तर 200 पोलिसांना फिक्स पॉइंट ड्युटीवर ठेवण्यात आले. तसेच क्राईम ब्रांचचे 30 पोलिस कर्मी परिसरात पेट्रोलिंग करत होते. मतगणनेनंतर विजयी उमेदवारांच्या जुलूसाच्या वेळेस 250 पोलिस कर्मचारी आणि 150 होमगार्ड तैनात करण्यात आले. संपूर्ण परिसरात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी एसआरपीएफची एक कंपनीही तैनात होती. मतगणनेदरम्यान नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी हा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# बिगुल वाजला!



महाराष्ट्रातील काही जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांची घोषणा निवडणूक आयोगाने केलेली आहे. १२ जिल्हा परिषदा व १२५ पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान होईल. उर्वरित २० जिल्हा परिषदा व २११ पंचायत समिती निवडणुकांचा कार्यक्रम ठरवण्यास अजून बराच विलंब लागणार असे एकूण घटनाक्रम वरून दिसते आहे.

सुप्रीम कोर्टाने ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पाडण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आयोगाने नगरपंचायती व नगरपंचायत तथा महानगरपालिकेच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. मात्र जिल्हा परिषद व पंचायत समितीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला नाही.

राज्यातल्या बराच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये आरक्षणाची वर्गवारी ५० % च्या वर गेलेली आहे.त्यामुळे तेथील निवडणुकांना विलंब होत आहे. सुप्रीम कोर्टाने आरक्षणाची मर्यादा ५०% च्या वर जाऊ नये असा निर्णय दिला होता.तरीपण नागपूर व चंद्रपूर या महानगरपालिकेत आरक्षणाची मर्यादा ५०% च्या वर गेल्याचे दिसून आले होते. तरी निवडणूक आयोगाने निवडणूक घेतली तशीच निवडणूक जिल्हा परिषद व पंचायत समितीची घेता आली असती. मात्र आयोगाने तसे न करता आरक्षणाची मर्यादा ५०% च्या आत असलेल्या जिल्हा परिषदेवर पंचायत समितीच्या निवडणुकांचा कार्यक्रम घोषित केला.

सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणुका घ्या असे सांगितले होते. स्वतःचाच निकाल फिरवून आता १५ फेब्रुवारी पर्यंत निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहे. मागे २८ नोव्हेंबर २०२५ रोजी न्यायालयाने आरक्षण ५०% च्या वर गेल्यास कोर्ट केव्हाही आरक्षण रद्द करू शकते असा इशारा दिला होता.

२८ नोव्हेंबर पासून आयोगाला जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचे आरक्षण नव्याने काढता आले असते मात्र आयोगाने यावर कुठलीही कारवाई केली नाही. गेल्या दीड महिन्यात नवीन आरक्षण काढून ३१ जानेवारीपर्यंत निवडणुका घेता आल्या असत्या.

मात्र निवडणूक आयोगाचा ढिसाळ कारभार यातून दिसून आला. शेवटी निवडणूक आयोगाला न्यायालयाकडे तारीख वाढवून मागावी लागली व न्यायालयाने निवडणूक आयोगाची विनंती मान्य करून निवडणुका १५ फेब्रुवारी पर्यंत घेण्याचे निर्देश दिले.

या साऱ्या घटनाक्रमात सर्वोच्च न्यायालय २१ जानेवारीला काय निर्णय देते यावर सर्व अवलंबून आहे. ओबीसी आरक्षणाच्या संबंधात निर्णय अपेक्षित आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाच्या दृष्टीने २१ जानेवारी महत्त्वपूर्ण ठरणार की पुन्हा तारीख पे तारीख मिळणार हा प्रश्नच आहे. त्यामुळे निवडणुका पुन्हा लांबणीवर जाण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणाच्या दृष्टीने २१ जानेवारी महत्त्वपूर्ण ठरणार की पुन्हा तारीख पे तारीख मिळणार हा प्रश्न निर्माण झाला आहे. १९३१ पासून आपल्या देशात जातनिहाय जनगणना झालेली नाही. यावर्षी १ एप्रिल २०२६ पासून जातिनिहाय जनगणना करण्याचे केंद्र सरकारने घोषित केले आहे. त्याचा अहवाल यायला वेळ लागणार आहे.

केंद्रात व्ही.पी सिंग यांचे सरकार सत्तेत असताना ७ ऑगस्ट १९९० ला मंडळ आयोग या देशात लागू केला. त्यामुळे ओबीसी समाजाला २७ टक्के आरक्षण लागू करण्यात आले. मात्र या आरक्षणा विरोधात काही लोकांनी उग्र आंदोलने केली. जाळपोळ केली, काहींनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली इंदिरा सहानी विरुद्ध केंद्र सरकार असा खटला १९९२ मध्ये सुरू झाला. ९ न्यायाधीशांच्या खंडपीठाने ६ विरुद्ध ३ च्या मताने आरक्षणाची मर्यादा ५०% च्या वर जाण्यास विरोध दर्शविला होता.



**नितीन कैलासराव गोहने**
**रा. हिरापूर ता. सावली**
**जि. चंद्रपूर.**
**8275393387**

तेव्हापासून ओबीसी आरक्षणाचे घोंगडे भिजत आहे. केंद्र सरकारने उच्चवर्गीय समाजासाठी १०३ वी घटना दुरुस्ती करून १०% आरक्षणाची तरतूद केली. त्यामुळे आरक्षणाची मर्यादा आपसूकच ५०% च्या वर गेल्याचे दिसून येते. तरी पण सर्वोच्च न्यायालयाने १०३ वी घटनादुरुस्ती वैध ठरवलेली आहे. मात्र ओबीसी आरक्षणाचे घोंगडे तसेच भिजत आहे.

केंद्र सरकारने आरक्षणाच्या बाबतीत स्पष्ट कायदा करायला हवा जो तो न्यायालयात जात आहे, याचिका दाखल करीत आहे, त्यामुळे वेळ वाया जात आहे. निवडणुकांवर याच्या विपरीत परिणाम होत आहे त्यासाठी सुस्पष्ट कायद्याची आवश्यकता आहे.

पंचायत राज व्यवस्था या देशासाठी कायमची वरदान ठरलेली आहे. ७३ व्या घटना दुरुस्तीने त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था या देशात लागू झाली. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, या त्रिस्तरीय व्यवस्थेमुळे ग्रामीण भागातील व्यक्तींना नेतृत्व करण्याची संधी मिळाली.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या राजकीय प्रवास बाभुळगावचे सरपंच यापासून सुरू झाला होता. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून अनेक राजकीय नेते उदयास आले मात्र या पंचायत राज व्यवस्थेच्या निवडणुका गेल्या पाच वषार्पासून लांबत असल्यामुळे ग्रामीण भागातील लोकांवर याच्या परिणाम पडलेला आहे.

राज्यकारभाराची सूत्रे प्रशासनाच्या हाती आल्यामुळे विकास कामावर परिणाम झाला आहे. त्यासाठी लोकभिमुख सरकार निवडणे हा पर्याय आहे. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी एक कायदेशीर दीर्घकालीन सुस्पष्ट नियमावली तयार करणे आवश्यक आहे.

सर्वोच्च न्यायालयाने एका निर्णयात ट्रिपल टेस्ट करण्याबाबत सूचना केली होती. ट्रिपल टेस्टमध्ये आरक्षणासाठी स्वतंत्र आयोग नेमणे, आरक्षणाचे प्रमाण निश्चित करणे, आरक्षण ५०% च्या वर जाणार नाही याची दक्षता घेणे, या मुद्द्यांच्या समावेश होता. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात जयंत कुमार बॅंठिया आयोग स्थापन करण्यात आला होता.

या आयोगाने जुलै २०२२ मध्ये आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला होता. या अहवालावर माननीय सर्वोच्च न्यायालय २१ जानेवारी रोजी काय निर्णय देते हेही पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या ना त्या कारणाने चर्चेचा विषय ठरत आहेत. न्यायालयात प्रलंबित असलेले खटले, निवडणूक आयोग, आरक्षण, यासारख्या कारणांमुळे निवडणुका दिवसागणित वाढत जात आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या ओबीसी आरक्षण २७% नुसार होतील असे स्पष्ट केले होते. मात्र सध्याची परिस्थिती पाहू जाता ओबीसी आरक्षणावर टांगती तलवार उभी आहे. ही परिस्थिती आहे. बेकायदेशीर निवडणुका होत असतील तर आम्ही निवडणुका रद्द करू असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. राजकीय आरक्षणाबाबत ठोस व स्पष्ट कायदा केंद्र सरकारने करावा अशी अपेक्षा आहे तेव्हाच हा घोळ संपू शकतो.

## महाराष्ट्राचा विवेकी आवाज : प्रा. डॉ. एन. डी. पाटील

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचा आज चौथा स्मृतिदिन.

चार वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १७ जानेवारी २०२२ रोजी प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे निधन झाले होते. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम. ए. आणि एल. एल. बी. चे शिक्षण घेतले.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले.

त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. (१९६२) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट. पदवी देऊन गौरवले.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली.

प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ. एन. डी. पाटील हे एक धडाडीचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा. डॉ. एन. डी. पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

■ ■ ■

## रंजक, बोधप्रद आणि ज्ञानवर्धक 'पत्रदोस्ती'

**डॉ. सुरेश सावंत**
**नांदेड.**

पत्रलेखन ही एक कला आहे. पत्रलेखन हे आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे आणि आपले विचार संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम आहे. काही वर्षांपूर्वी पत्रलेखनाला पर्यायच नव्हता. पत्रलेखन ही माणसांची मानसिक आणि भावनिक गरज होती.

दूरच्या नातेवाईकांना आणि मित्रांना ख्यालीखुशाली कळविण्याचा आणि संवाद साधण्याचा पत्रलेखन हाच एकमेव मार्ग होता. हल्ली समाजमाध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे पत्रलेखनाचे प्रमाण कमी झाले असले, तरी पत्रलेखनाचे महत्त्व कमी झालेले नाही. पूर्वीच्या लेखक-कवींनी, विचारवंतांनी लिहिलेल्या पत्रांचे खंड प्रकाशित झाले आहेत. त्या पत्रांतून त्या पत्रलेखकांचे मन, त्यांच्या भावना, त्यांचे विचार, त्यांचा काळ आणि त्यांची संस्कृती समजते. तात्पर्य काय, की पत्रलेखन हा मानवी मनाचा आणि जीवनाचा आरसा असतो.

डॉ. निर्मोही फडके यांचे 'पत्रदोस्ती' हे पुस्तक म्हणजे छोटा दोस्त निनाद आणि त्याचा इटुकला हिरवा मित्र (सदाफुलीचे रोपटे) यांच्यात झालेला पत्रसंवाद आहे. जर लेखिकेने दोन समवयस्क शालेय मित्रांची 'पत्रदोस्ती' घडवली असती, तर फक्त दोन मुलांचेच भावविश्व उलगडले असते.

इथे एक मुलगा आणि एक रोपटे यांच्यातली 'पत्रदोस्ती' असल्यामुळे वृक्ष - वनस्पतींचेही भावविश्व वाचकांसमोर उजागर झाले आहे. दोन वेगवेगळ्या स्तरांवरचा हा पत्रसंवाद असल्यामुळे ही 'पत्रदोस्ती' अद्भुतरम्य आणि रोमांचकारी झाली आहे. ही कल्पनाच अफलातून आहे! लेखिकेच्या कल्पकतेला दाद दिलीच पाहिजे!

निनाद आपल्या आजीच्या घरच्या कुंडीतील सदाफुलीच्या रोपट्याला पत्र लिहून आपल्या भावना कळवतो. विशेष म्हणजे ते हिरवे रोपटेही निनादला पत्र लिहून आपल्याकडची ख्यालीखुशाली कळवते. याचा अर्थ हे दोघेही एकमेकांचे बेस्ट 'पेनफ्रेंड' बनले आहेत.


हिरवा दोस्त निनादला पत्र लिहून कळवतो, की तुमच्यातली मोठी माणसं आम्हा झाडांशी अतिशय दुष्टपणे वागतात. आम्ही माणसांसारखे क्रूर नाही. दुःख सहन करूनही दुस?याला आनंदच द्यायचा हेच आमचं आयुष्य. त्यामुळे जमेल तसं आणि जमेल तितकं आम्ही चांगुलपणानंच वागतो.

झाडांचे हे दुःख भावी पिढीपर्यंत पोहोचले, तरी ह्या पत्रलेखनाचे सार्थक झाले म्हणायचे! हिरव्या दोस्ताचे पत्र वाचताना निनादला त्या अक्षरांतून मस्त मातीचा वास जाणवतो. निनादची ही संवेदनशीलताही तितकीच महत्त्वाची आहे! एकमेकांना पत्र लिहिण्यात दोघांनाही मजा येते. आपला आनंद वाटला की वाढतो.

आपली कला इतरांसमोर मांडणं म्हणजे सगळ्यांना आनंद वाटणं आणि वाढवणं, हे दोघांनाही समजलं आहे. जेव्हा निनाद आजीच्या घरी जातो, तेव्हा हा हिरवा दोस्त आपल्या इवल्या फांद्या हलवून हसतो आणि पानांच्या टाळ्या वाजवतो. शेजारची सानिका कविता लिहिते आणि आजीला वाचून दाखवते. ते पाहून हिरवा दोस्त म्हणतो, 'माझ्या अंगावर उमलणारं एकेक फूल म्हणजे माझी कविताच असते की रे'. झाडावर उमलणारे फूल म्हणजे त्या झाडाची कविता, ही कल्पनाच किती भन्नाट आहे!

निनाद आपल्या पत्रांतून आपल्या खेळांबद्दल लिहितो. मित्रांसोबत केलेल्या भेळ-पन्हं पार्टीबद्दल लिहितो. आपल्या शाळेतील 'पुस्तक-साखळी' ह्या उपक्रमाबद्दल लिहितो. आपण आपल्या आत्याकडे कोकणात गेल्याचे कळवतो.

कोकण का आणि किती आवडले, त्याबद्दल लिहितो. निनादने केलेली कोकणातील कौलारू घरे, समुद्राची गाज, फेरीबोटीचा अनुभव, समुद्रसफरीच्या गमतीजमती, काळंभोर आकाश, लुकलुकणाऱ्या चांदण्या, वाऱ्यावरून वाहत जाणारे ढगोबा, वाऱ्यावर हलणाऱ्या नारळीच्या मोठमोठ्या झावळ्या आणि वेगवेगळी फुलझाडे



यांची वर्णने अतिशय चित्रदर्शी आहेत. ही वर्णने वाचून हिरवा दोस्त खूश होतो.

निनाद हा मुंबईत इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणारा विद्यार्थी आहे. तरीसुद्धा इंग्रजीच्या बरोबरीने जमेल तेवढं मराठीही वाचायचं आणि लिहायचं आपण ठरवलय, असं तो आपल्या हिरव्या दोस्ताला कळवतो. निनादचं हे मराठीप्रेम कौतुकास्पद आहे!

हिरवा दोस्त निनादला लिहितो, आपल्याकडे जे असतं तेच भरपूर असतं, ते समजणं, शोधून काढणं हेच महत्त्वाचं असतं. हिरव्या दोस्ताची ही समाधानी वृत्ती अनुसरणीय आहे. दोघांची भाषा वेगवेगळी असली, तरी दोघांचीही एकमेकांना समजून घ्यायची तयारी आहे. दोघांनाही प्रदूषणाचा भयंकर तिटकारा आहे. शेजारच्या कुंडीतील मनीप्लांट सदाफुलीला गुदगुल्या करतो, हे वाचून हसायला येते.

निनाद पावसाबद्दल लिहिताना 'धुमेधार' हा शब्द वापरतो. तो दुरुस्त करून हिरव्या दोस्ताने 'मुसळधार' हा शब्द सुचवला आहे. हिरवा दोस्त निनादला लिहितो, 'जसा प्रदेश असेल, मिळेल त्या प्रकारचं जगायला आम्ही शिकतो'. यावरून वनस्पतींची समायोजनक्षमता आपल्या लक्षात येते.

निनाद हा इंग्रजी माध्यमाचा विद्यार्थी असल्यामुळे त्याच्या पत्रात टाईमपास, ग्रूप, सिक्रेट, क्यूट, ड्रीम, करेक्ट, आय मीन, स्वीट मेमरी, एनर्जी, टीचर, आयडिया, एन्जॉय, वीकेंड, लास्ट, कॉर्नर, गार्डन, प्रॉमीस, मिस, व्हायरल, सरप्राईज यांसारखे इंग्रजी शब्द येतात. अर्थात लगेच तो ह्या शब्दांसाठी पर्यायी मराठी शब्दही देतो. त्यामुळे ही पत्रं वाचताना मजा येते.

ह्या पत्रांची भाषा ही खास पोरवयातील मुलांची भाषा आहे. ह्या भाषेमुळे ही पत्रं अतिशय ओघवती आणि वाचनीय झाली आहेत. दोघेही एकमेकांना आपल्या आयुष्यातील गमतीजमती सांगतात. त्यामुळे ही पत्रं उत्कंठावर्धक झाली आहेत.

निनाद आणि हिरव्या मित्राच्या ह्या पत्रमाळेत खूपच धमाल आहे! त्यांच्याच भाषेत सांगायचे तर यात 'थ्रिल' आहे! ह्या पत्रलेखनात भरपूर फॅण्टसी आहे. किंबहुना फॅण्टसी हाच ह्या लेखनाचा आत्मा आहे. ह्या पुस्तकाची पांढरी शुभ्र पाने झाडाची हिरवीगार पाने होऊन वाचकाच्या मनाला स्पर्शून जातात.

ही पत्रे सगळ्या विषयांना स्पर्श करतात. ह्या पत्रांतून पत्रलेखनाचे महत्त्व तर समजतेच, शिवाय जलचक्राची माहिती मिळते. वनस्पतींच्या भावभावना समजतात. ही 'पत्रदोस्ती' रंजक तर आहेच, शिवाय बोधप्रद आणि ज्ञानवर्धक आहे. ही सगळी पत्रे म्हणजे एक अखंडित भावकाव्यच आहे. डॉ. निर्मोही फडके यांनी केलेला पत्रलेखनाचा हा प्रयोग मराठी बालसाहित्यासाठी उपकारक ठरेल, असा विश्वास वाटतो.

-----------------

'पत्रदोस्ती' (पत्रात्मक संवाद)
लेखिका : डॉ. निर्मोही फडके
प्रकाशक : व्यास क्रियेशन्स, ठाणे
पृष्ठे ८४ : किंमत रु. १२५

■ ■ ■

## महापालिका निवडणुकीतही पुन्हा तोच गोंधळ !

**पूर्वार्ध**

राज्यातील २९ महापालिकांसाठी मतदान यंदा गोंधळातच पार पडले. तब्बल ८ वर्षानंतर निवडणूक लागल्याने यंदा मुंबई-ठाणे वगळता मतदारांमध्ये कमालीचा उत्साह होता.

मतदानाचा टक्का वाढावा यासाठी सरकारसह, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, मंडळे तसेच राजकीय पक्षांनीही यंदा बरेच परिश्रम केले. मतदान वाढावे यासाठी सामाजिक माध्यमे तसेच तंत्रज्ञानाचाही पुरेपूर वापर करण्यात आला होता, सामान्य नागरिकांनीही आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून आपल्या मित्र मंडळींना, फॉलोअर्सना मतदान करण्याचे आवाहन केले होते.

इतक्या मोठ्या प्रमाणात जागृती करूनही दरवेळेस जे होते ते यावेळेसही झाले. मुंबईतील मतदानाचा टक्का काही वाढला नाही. लोकसभा, विधानसभा यानंतर आता महापालिका निवडणुकांतही निवडणूक आयोगाच्या ढिसाळ कारभारामुळे मतदारांचे नाहक हाल झाले.

महापालिका वार्डांच्या पुनर्रचनेमुळे कितीतरी मतदारांची नावे विभागली गेली. ज्यामुळे मतदारांना आपली नावे शोधण्यासाठी एका मतदान केंद्रावरून दुसऱ्या मतदान केंद्रावर फेऱ्या माराव्या लागत होत्या. कित्येक मतदारांची नावे मतदार याद्यांमधून गायब झाली होती.

मुंबईतील घर भाड्याने देऊन राहण्यासाठी मुंबई बाहेर गेलेले अनेक जण मतदानासाठी मुंबईत आले होते. अशांपैकी अनेकांची नावे मतदार यादीतून गायब झाल्याने त्यांना मतदान न करताच परतावे लागले. घरातील ४ सदस्यांपैकी एका सदस्याचे नाव मतदार याद्यांतून गायब झाल्याने ते शोधण्यामध्ये राजकीय पक्षांच्या बुथवर बसलेल्यांची दमछाक होत होती. एकेकाचे नाव शोधण्यात बराच वेळ लागत असल्याने अनेक बुथवर नागरिकांचे मोठे घोळके झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते. विशेष म्हणजे ज्यांनी विधानसभा निवडणुकीला मतदान केले अशांचीही नावे काही ठिकाणी लुप्त झाली होती.



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

अनेक ठिकाणी मृत व्यक्तींची नावे मतदार याद्यांत पुन्हा समाविष्ट झालेली पाहायला मिळत होती. निवडणूका दर वर्षी होत नसल्या तरी निवडणूक आयोग निवडणूक जवळ आल्यावरच जागे होते का? भारतात प्रत्येकाचे आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, बँकेतील खाती सरकारने एकमेकांशी लिंक करून घेतली आहेत. एकदा नोंदवलेली नावे अन्य कोणत्याही ठिकाणाहून लुप्त होत नाहीत मग मतदार याद्यांमधूनच ती कशी गायब होतात?

मृत व्यक्तीची सरकार दरबारी नोंद करणे आता सर्वत्र अनिवार्य करण्यात आले आहे. मृत व्यक्तीचे मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र निघाल्यावरही मतदार याद्यांमधून ते नाव का काढले जात नाही किंवा एकदा काढलेले नाव पुढच्या निवडणुकीच्या वेळी यादीमध्ये कसे काय जोडले जाते? निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मतदार याद्या अद्यावत करण्याचे काम कोणाचे आहे?

**(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)**

■ ■ ■

## वसा पालकत्वाचा

**वाचक लिहितात**

आपत्य जन्मानंतर नवरा बायको आई वडील म्हणजेच पालक बनतात. पालकत्व ही फार मोठी जबाबदारी आहे. पालकांना एक जीव घडवायचा असतो. गर्भात असल्यापासून जन्म झाल्यानंतर काही वर्षे त्या मुलाचा मेंदू फक्त ग्रहण करत असतो. ग्रहण केल्यानंतर त्याचे विश्लेषण करण्याची क्षमता जेव्हा त्याच्यात येते तेव्हा तो सज्ञान होतो.

सज्ञान होण्यापूर्वीची ही काही वर्षे खूप महत्त्वाची असतात. याचवेळी त्याच्यावर जे संस्कार होतात त्याप्रमाणे तो पुढे जाऊन चांगला किंवा वाईट व्यक्ती होते. हेच सत्य ओळखून हिंदू धर्मात गर्भसंस्काराचे महत्त्व आहे.

आधुनिक वैद्यक शास्त्रानुसार देखील गर्भधारणा झाल्यावर पती-पत्नीने सिगरेट, दारू पिऊ नये, आपसात भांडण करू नये, रात्री उशिरा झोपणे, मोबाईल, टीव्हीच्या जास्त प्रमाणात वापर टाळण्याचा सल्ला दिला जातो. चांगले वाचणे, चांगले ऐकणे, सात्विक शुद्ध आहार घेणे, व्यायाम करणे हे बाळाच्या वाढीसाठी महत्त्वपूर्ण ठरते. डॉक्टरांनी सांगितले की सर्वजण ते करतात पण आपल्या धर्मात सांगितलेल्या गोष्टींचा उपहास केला जातो.

आहार, आचार आणि विचार ही जीवनाची त्रिसूत्री आहे. हे जर चांगले असेल तर जन्माला येणारी पिढी ही सुसंस्कृतच असते. आजकाल एखादेच अपत्य असते आणि पालकांकडे त्याचा हट्ट पुरवण्याएवढी आर्थिक क्षमता असते. मुलांनी जे मागितले,जेव्हा मागितले, ते क्षणाचाही विचार न करता आणून दिले जाते. मुलांना त्याची सवय होते. नाही, नकार ऐकण्याची सवय नसते. ही सवय भविष्यात घातक ठरू शकते.

अगदी खून, हत्या करण्यापर्यंत नकार न ऐकण्याच्या सवयीचे परिणाम होतात.पालकांची ही स्थिती मुले लवकर ओळखतात आणि भावनिक दबाव आणून आपला हट्ट पुरवून घेतात. आई-वडीलच सकस, शुद्ध, घरचे जेवण घेत नसल्याने मुलांनाही त्याची आवड नसते. बाजारात मिळणाऱ्या खाद्यपदार्थात कृत्रिम रंग, हानिकारक/ सिंथेटिक घटक घातलेले असतात. या पदार्थात असणारा एक रंग रेड ४० हा मुलांमध्ये अतिक्रियाशीलता, एकाग्रता नसणे, अस्थिरता आणि अतिक्रियाशीलता विकृती यांचे प्रमाण वाढवतात. सतत खाल्ल्याने एलर्जीपासून, पोटाचे आजार आणि क्रोहन डिसीज म्हणजेच आतड्याचे आजार होऊ शकतात.

आचरणाच्या बाबतीत म्हणायचे झाले तर आईच कुंकू न लावणे, मंगळसूत्र, बांगड्या न घालणे, सात्विक वेशभूषा ऐवजी पॅन्ट शर्ट, उत्तेजित करणारे कपडे घालत असल्याने मुलीही तसेच कपडे घालतात. हिंदू वैचारिक आतंकवादाचे बळी ठरले आहे. त्यामुळे ते आपल्या संस्कृती पासून विन्मुख झाले आहे. पाश्चात्य विकृती आपण अंगीकारली आहे त्यामुळे आपले विचार स्वार्थी बनत चालले. विचारनुसारच आपली कृती होत असते.

आपल्या मुलांना आपल्याच सहभागाची सगळ्यात अधिक आवश्यकता आहे. जन्म दिल्याने पालक होता येत नाही आणि शाळा, उपक्रम, मैदान,शिबिरे यांचे शुल्क भरल्याने संगोपन होत नाही.

आपल्या मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचे शिल्प अधिक देखणे करायचे असेल तर टाकीचे घाव सोसल्याविणा मुलांना उत्तमपण येणार नाही आणि हे घाव योग्य वेळी पालकांनीच घातले पाहिजे. हे घालत असताना पालकांनी प्रथम स्वतःमध्ये चांगले आचार, चांगले विचार आणि आहार घेणे आणि सुसंस्कार घडवून आणणे गरजेचे आहे. मुलं ही अनुकरणप्रिय असतात त्यामुळे आपले पाहून ते तसे वागतात. आपल्यातील बदल हाच मुलांमध्ये बदल घडवू शकतो.

■ **लीना मकरंद गाडगीळ**
**पनवेल.**

## पोषणतत्त्वांचा खजिना आणि फिटनेसचा गुपित मंत्र

**(कालच्या अंकावरून पुढे)**



उच्च कोलेस्ट्रॉल हे हृदयरोगाचे एक प्रमुख कारण आहे. मोरिंगा पावडरमध्ये आयसोथियोसायनेट्स नावाचे संयुगे असतात, जे एलडीएल कमी करतात, जे रक्तवाहिन्यांवर चिकटून राहतात आणि रक्तदाब संतुलित ठेवण्यास मदत करतात. डब्ल्यूएचओने देखील हे हृदयासाठी चांगले मानले आहे.

शेवग्याच्या पावडरमध्ये व्हिटॅमिन ए, ई आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे बारीक रेषा, सुरकुत्या आणि मुरुम कमी करण्यास मदत करतात. इंडियन जर्नल ऑफ त्वचाविज्ञानाच्या मते, मोरिंगा त्वचेला प्रदूषण आणि अल्ट्राव्हायोलेट किरणांमुळे होणार्या नुकसानीपासून संरक्षण करण्यास सक्षम आहे.

मोरिंगा पावडरमध्ये असलेले प्रथिने, लोह आणि जस्त केसांच्या वाढीस चालना देतात आणि केसांच्या रोमांना मजबूत करतात. मोरिंगा तेलाचे नियमित सेवन किंवा बाह्य वापर केल्याने डोक्यातील कोंडा आणि कोरडेपणा कमी होऊ शकतो.

मोरिंगा पावडरमध्ये कॅलरी कमी असते परंतु अधिक पोषक द्रव्ये असतात. हे चयापचय वेगवान करते, चरबी बर्न करण्यास मदत करते आणि लालसा कमी करते. ते पाण्यात किंवा स्मूदीमध्ये मिसळून पिणे वजन कमी करण्याच्या प्रक्रियेस समर्थन देऊ शकते. मोरिंगा पावडरमध्ये कॅल्शियम आणि फॉस्फरसचे प्रमाण जास्त असते, जे हाडे मजबूत करण्यास आणि ऑस्टिओपोरोसिससारख्या समस्यांपासून बचाव करण्यास मदत करते.

मोरिंगा नैसर्गिक डिटॉक्सिफायरसारखे कार्य करते. त्यात असलेले क्लोरोफिल आणि अँटीऑक्सिडंट्स यकृत स्वच्छ करण्यास आणि शरीरातून विषारी घटक काढून टाकण्यास मदत करतात.

कुपोषित समुदायांमध्ये डिटॉक्सिफिकेशन आणि उर्जा वाढविण्यासाठी मोरिंगाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यासाठी हा कार्यक्रम कर्नाटकात आणण्यात आला.

मोरींगा पावडर म्हणजे शेवग्याच्या पानांची पावडर असून ती आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. यात जीवनसत्त्वे अ, उ, ए, कॅल्शियम, लोह आणि अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. मोरींगा पावडर रोगप्रतिकारक शक्ती वाढवते व संसर्गापासून संरक्षण करते.

ती पचनक्रिया सुधारते, बद्धकोष्ठता कमी करते आणि आतड्यांचे आरोग्य चांगले ठेवते. मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करते. तसेच हाडे मजबूत करते, अशक्तपणा कमी करते आणि त्वचा व केसांचे आरोग्य सुधारते. नियमित व योग्य प्रमाणात सेवन केल्यास शरीर निरोगी व ऊर्जावान राहते.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## मोबाईलची मोहिनी

अआ ई उ लेकरांना
शिकवावे लागे धरून हात
मोबाईलचं टेकनिक न
शिकविता
कसं काय होते आत्मसात?

निरीक्षणाने बालके
आत्मसात करती कला
त्यांच्यासमोर मोबाईल
न वापरलेलाच बरा . .

दिला नाही मोबाईल
तर पप्पू भोकाड पसरते
त्यांच्या हट्टापायी शेवटी
पालकच हतबल होते . .

# अंगणवाडी अनुदानात ‘खंडणी’चा धक्कादायक प्रकार?

## दोषी अधिकारी हटवला, पण त्याच कार्यालयातच ‘सुरक्षित’!

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.16 ) –** तालुक्यातील अंगणवाडी सेविकांसाठी शासनाकडून देण्यात येणाऱ्या परसबाग निर्मिती व पालन-पोषणासाठीच्या प्रत्येकी 5 हजार रुपयांच्या अनुदानात थेट ‘खंडणी’सदृश वसुली होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने महिला व बालकल्याण विभागाची प्रतिमा पुन्हा एकदा मलीन झाली आहे. एकात्मिक बालविकास अधिकारी यांच्या सांगण्यावरून तिसऱ्या व्यक्तीमार्फत ही रक्कम वसूल केली जात असल्याचे समोर आले असून, संबंधित अधिकाऱ्यांनीही यास दुजोरा दिल्याने प्रकरण



अधिकच गंभीर बनले आहे.

या गैरप्रकाराचा पर्दाफाश ‘दैनिक महासागर’ने सखोल वृत्तसंकलनातून केला. त्यानंतर प्रभारी एकात्मिक बालविकास अधिकारी यांच्याकडून पदभार काढून त्या ठिकाणी आनंद जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. मात्र, ज्या अधिकाऱ्यावर थेट अनुदान वसुलीचे आरोप आहेत, त्या पाचपुते यांनाच त्याच कार्यालयात विस्तार अधिकारी म्हणून कायम ठेवण्यात आल्याने प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, संबंधित अधिकाऱ्यांविरोधात यापूर्वीही अनेक तक्रारी प्रलंबित असताना, एवढ्या गंभीर स्वरूपाच्या प्रकरणानंतरही त्यांना ‘सुरक्षित’ ठेवण्याचा निर्णय कोणत्या नियमांनुसार घेतला, असा थेट सवाल जिल्हा महिला व बालकल्याण अधिकाऱ्यांना विचारला जात आहे. नातेवाईकांच्या दबावामुळे कठोर कारवाई होत नसल्याची चर्चा आता अधिक तीव्र झाली आहे.याहून गंभीर बाब म्हणजे, तक्रार करणाऱ्या अंगणवाडी सेविकांवरच दबाव टाकण्यात येत असल्याचे आरोप पुढे आले आहेत. तक्रार मागे घेण्यासाठी धमकावणे, मानसिक छळ करणे असे प्रकार घडत असताना वरिष्ठ अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. अल्प उत्पन्नावर काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना मिळणारे तुटपुंजे अनुदानही ‘कमिशन’शिवाय मिळत नसेल, तर गरीबांसाठीच्या योजनांवरील विश्वास कसा टिकणार, असा सवाल उपस्थित होत आहे. दोषींवर कठोर कारवाई होणार की प्रकरण पुन्हा ‘फाइलखाली’ दडपले जाणार, याकडे तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# कारला-काळगव्हाण-वडनेर गंगाई रस्त्याची दयनीय अवस्था

## नागरिक, शाळकरी मुलांचे हाल; अपघातांचा धोका वाढला

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि. 16 ) –** तालुक्यातील कारला ते काळगव्हाण ते वडनेर गंगाई हा अत्यंत महत्त्वाचा मार्ग सध्या अतिशय दयनीय अवस्थेत असून या रस्त्यावरून प्रवास करताना नागरिकांना प्रचंड कसरत करावी लागत आहे. मोठमोठे खड्डे, उखडलेले डांबरीकरण आणि ठिकठिकाणी खचलेली माती यामुळे हा रस्ता अक्षरश: जीवघेणा ठरत आहे.



> हा मार्ग आमच्या दैनंदिन जीवनातील अत्यंत महत्त्वाचा आहे. अनेकदा निवेदने दिली, मात्र अद्याप दखल घेतली नाही. लवकर काम सुरू न झाल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.
>
> **जावेद, सामाजिक कार्यकर्ता, काळगव्हाण**

> कारला ते काळगव्हाण रस्ता अर्थसंकल्पात मंजुरीसाठी प्रस्तावित आहे. मंजुरी मिळेपर्यंत नियतकालीन देखभाल-दुरुस्ती अंतर्गत खड्डे बुजविण्याचे काम सुरू करण्यात येईल.
>
> **किशोर राऊत, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंजनगाव सुर्जी**

कारला येथून राष्ट्रीय महामार्ग अंजनगाव-अकोटवरून निघणारा हा रस्ता कारला-निमखेड आडे-धामणगाव चोरे-काळगव्हाणङ्कवडनेर गंगाई असा आहे. वडनेर गंगाई हे गाव दर्यापूरङ्कअकोट मुख्य मार्गावर असल्याने अंजनगाव सुर्जी ते अकोट तसेच दर्यापूरकडे जाण्यासाठी हा मार्ग कमी अंतराचा व सोयीचा मानला जातो. मात्र सध्या त्याची अवस्था इतकी खराब झाली आहे की सोयीचा मार्ग आता त्रासदायक ठरू लागला आहे.

काळगव्हाण हे अंजनगाव सुर्जी तालुक्यातील अखेरचे गाव असून येथील नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी हा एकमेव मार्ग आहे. आरोग्य सेवा, शासकीय कामकाज, बाजारपेठ तसेच दैनंदिन गरजांसाठी ग्रामस्थांना याच रस्त्यावर अवलंबून राहावे लागते. रस्त्याच्या दयनीय अवस्थेमुळे वेळेत पोहोचणे अवघड झाले आहे.

या मार्गावरून शाळकरी विद्यार्थी दररोज शिक्षणासाठी प्रवास करतात. कारला ते काळगव्हाण हे सुमारे सहा किलोमीटरचे अंतर असून संपूर्ण मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य आहे. लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दुचाकी घसरून पडण्याच्या घटना वाढल्या असून अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे. वाहनचालकांचेही नुकसान होत असून सस्पेन्शन, टायर व इतर भाग वारंवार खराब होत आहेत.

पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होते. चिखलामुळे वाहने रुतून बसण्याचे प्रकार घडत असून रात्रीच्या वेळी प्रवास करणे जीव धोक्यात घालण्यासारखे असल्याचे नागरिक सांगतात. अनेकदा तक्रारी करूनही ठोस उपाययोजना न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

# नांदगाव खडेश्वर येथील आयटीआयमध्ये तंत्रज्ञानाची रंगत

## ‘कांतारा’ मॉडेल ठरले आकर्षणाचे केंद्र

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर, ( दि.16 ) –** नांदगाव खंडेश्वर येथील एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे बुधवारी (ता. 14) भव्य तंत्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनीत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, कौशल्य आणि नवकल्पनांचे प्रभावी दर्शन घडले. आयटीआयचे प्रभारी प्राचार्य सुरेश मेंढे यांच्या उपस्थितीत व राजाभाऊ देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीकांत दांडगे यांच्या हस्ते रिबीन कापून तंत्र प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले.या प्रदर्शनीत विविध ट्रेडच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली उपयुक्त, नाविन्यपूर्ण आणि भविष्याभिमुख मॉडेल्स सादर करण्यात आली. विशेषत: बेसिक कॉस्मेटोलॉजी ट्रेडच्या विद्यार्थ्यांनी साकारलेले ‘कांतारा’ हे संकल्पनात्मक मॉडेल आकर्षणाचे केंद्र ठरले. कल्पक मांडणी, सुस्पष्ट सादरीकरण आणि तंत्रज्ञानाशी सुसंगत



संकल्पनेमुळे या मॉडेलने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. प्रदर्शनीत वॉटर फाउंटन, बाईक इंडिकेटर, टेस्ला कॉइल, सीड्स क्लिनिंग मशीन, डिजिटल हार्ट पल्स व तापमान मीटर, पास प्रो सॉफ्टवेअर, वाहन अपघात नियंत्रण प्रकल्प, ऑटोमॅटिक नाईट सेन्सर, जलविद्युत प्रकल्प, पोर्टेबल शेगडी, शीट मेटल फोल्डिंग मशीन, मानवचलित पेरणी यंत्र, मेकॅनिकल वॉच तसेच फॅशन डिझाईन व वेल्डर ट्रेडची विविध मॉडेल्स सादर करण्यात आली. या सर्व प्रकल्पांमधून विद्यार्थ्यांचे तांत्रिक ज्ञान, व्यावसायिक कौशल्य आणि नवोपक्रमशीलता ठळकपणे दिसून आली.या तंत्र प्रदर्शनीला डॉ. झाकीर हुसेन उर्दू जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी भेट देत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यांनी विविध मॉडेल्सची माहिती जाणून घेत तंत्रज्ञानाविषयी कुतूहल आणि आवड व्यक्त केली. एकूणच, नांदगाव खंडेश्वर आयटीआयची ही तंत्र प्रदर्शनी विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासाला चालना देणारी, उद्योगाभिमुख शिक्षणाचे प्रभावी उदाहरण ठरली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयटीआयचे शिल्पनिदेशक तुषार जैन, राजकुमार धोटे, प्रफुल्ल कचरे, वैभव जाधव, निलेश देऊळकर, राम इखार, शहजाद खान, सुशिल सरोदे, सागर डांगे, चिन्मय दहाट, वैभव केणे, प्रशांत पोच्ची, सचिन वाहणे, सचिन दुवदने, मयुरी वसुले, रूचिका डोरस, संगिता बिबेकर, दिपाली लोखंडे, रूपाली लांडे, सुरक्षारक्षक धिरज तायडे तसेच सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# अचलपूर नगरपालिकेत कॉँग्रेसची बाजी

## उपाध्यक्षपदी खुर्शिदाबानो अत्ताशा यांची निवड

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.16 ) –** अचलपूर नगरपरिषदेत मंगळवार, दि. 15 जानेवारी 2026 रोजी उपाध्यक्ष पदासाठी आयोजित विशेष सभेत कॉँग्रेस गटाच्या खुर्शिदाबानो अत्ताशा यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. झालेल्या मतदानात अत्ताशा यांना 23 मते मिळाली, तर भाजपच्या उमेदवार आसवानी यांना 19 मते मिळाली. त्यामुळे कॉँग्रेसने या महत्त्वाच्या पदावर आपले वर्चस्व कायम राखले.

या सभेत नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्यांचीही निवड करण्यात आली. भाजप गटातून अभय माथणे, कॉँग्रेस गटातून अब्दुल मुजीब, तर अपक्ष गटातून निल माहेश्वरी आणि अनिल चि. अग्रवाल यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड झाली.

उपाध्यक्षपदाची संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शांततेत व लोकशाही मार्गाने पार पडली.



निवडीनंतर कॉँग्रेस गटातर्फे आनंद व्यक्त करण्यात आला. नवनिर्वाचित उपाध्यक्ष खुर्शिदाबानो अत्ताशा यांनी सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पक्षभेद विसरून काम करण्याचे आश्वासन दिले. सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष उपस्थित होते. यावेळी नगरसेवक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वृद्ध महिलेचा विनयभंग

**अमरावती –** सरमसपुरा पोलिस ठाणे हद्दीतील 85 वर्षीय वृद्ध महिलेच्या घरात रात्रीच्या वेळी घुसून तिचा विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी 59 वर्षीय मद्यपी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

# चिखलदरा नगरपरिषदेच्या उपाध्यक्षपदी प्रमोद नाईक अविरोध

## स्वीकृत नगरसेवकांची निवड जाहीर



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.16 )–** चिखलदरा नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष व स्वीकृत नगरसेवक पदांसाठी आज निवडणूक प्रक्रिया पार पडली. यानिमित्त नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा पालिका सभागृहात पिटासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी मुख्याधिकारी धीरज गोहाड उपस्थित होते.

उपाध्यक्षपदासाठी कॉँग्रेस पक्षाकडून प्रमोद पंजाबराव नाईक यांनी एकमेव अर्ज दाखल केला होता. भाजपाकडून या पदासाठी कोणताही उमेदवार न दिल्याने प्रमोद नाईक यांची उपाध्यक्षपदी अविरोध निवड जाहीर करण्यात आली. त्यांच्या निवडीने कॉँग्रेस गटात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून नगरपरिषदेत कॉँग्रेसचे बळ अधिक दृढ झाल्याचे चित्र आहे. स्वीकृत नगरसेवकपदी कॉँग्रेसकडून नगराध्यक्षांचे मोठे बंधू शेख अमीर शेख हैदर यांची निवड करण्यात आली. तर भाजपाकडून महेशसिंह सोमवंशी यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून वर्णी लागली. दोन्ही पक्षांना प्रत्येकी एक स्वीकृत नगरसेवक मिळाल्याने नगरपरिषदेत सत्तासंतुलन राखले गेले आहे. या सभेला कॉँग्रेस व भाजप दोन्ही पक्षांचे नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रुपेश चोबे, अरुण तायडे, सुवर्णा चंदामी, राजेश मांगलेकर (भाजपा गटनेते, नगरपरिषद चिखलदरा) यांच्यासह सर्व निवडून आलेले नगरसेवक बैठकीस उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया शांततेत व पारदर्शक पद्धतीने पार पडली. नवनिर्वाचित उपाध्यक्ष प्रमोद नाईक व स्वीकृत नगरसेवकांचे उपस्थितांनी अभिनंदन करून नगरविकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# उबाठाच्या नगरसेवकांनीच उबाठाचा उमेदवार पाडला!

## अंजनगाव सुर्जी उपनगराध्यक्ष निवडणुकीत शेवटच्या क्षणापर्यंत थरार

## भाजपाच्या प्रियंका मालठाणे विजयी

## अभद्र युतीला आमदारांची मुकसंमती? शहरात जोरदार चर्चा



***महासागर प्रतिनिधी***

***अंजनगाव सुर्जी,( दि.16 )–अंजनगाव सुर्जी नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत राजकीय नाट्याचा कडेलोट पाहायला मिळाला. शेवटच्या क्षणापर्यंत अनिश्चितता कायम असताना अखेर भाजपाच्या प्रियंका शंकर मालठाणे यांनी विजय मिळवला. या निकालाने मात्र सर्वाधिक धक्का शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) गटाला बसला, कारण पक्षाच्या नगरसेवकांनीच पक्षादेश झुगारून भाजपाला साथ दिल्याने स्वत:च्याच उमेदवाराचा पराभव झाल्याचे स्पष्ट झाले.***

नगर पालिकेची सार्वत्रिक निवडणूक इतर नगरपालिकांच्या तुलनेत उशिरा झाली होती. 20 डिसेंबर रोजी मतदान, 21 डिसेंबर रोजी निकाल आणि तब्बल 25 दिवसांनंतर, 16 जानेवारी रोजी उपनगराध्यक्षपदाची निवडणूक पार पडली. या विलंबामुळे शहरातील राजकीय वातावरण तापले होते आणि वेगवेगळ्या आघाड्यांचे समीकरण बदलत गेले.

### मतदानाचा निकाल

प्रियंका शंकर मालठाणे (भाजप) – 15 मते

सुयोग खाडे (शिवसेना – उबाठा) – 11 मते

रामण्य आवंडकर (शिवसेना – शिंदे गट) – 3 मते

**या निकालात भाजपाच्या प्रियंका मालठाणे उपनगराध्यक्षपदी विजयी ठरल्या.**

### स्वीकृत सदस्यांची निवड

दरम्यान, नगरपालिकेतील तीन स्वीकृत सदस्यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. भाजपाकडून – संतोष वर्मा

शिवसेना (उबाठा) कडून – पंकज मोदी

कॉँग्रेसकडून – अब्दुल कलिम अब्दुल कलाम

**यांची स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**

### लवटे यांचा भ्रमणध्वनी स्वीच ऑफ

भाजप-शिवसेना (उबाठा) युतीबाबत आमदार गजानन लवटे यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी पत्रकारांनी संपर्क साधला असता त्यांचा मोबाईल क्रमांक स्विच ऑफ असल्याचे आढळून आले.

### आघाडीचे गणित कोलमडले

निवडणूक निकालानंतर नगरपालिकेत महाविकास आघाडीचाच उपनगराध्यक्ष होईल, असे जवळपास निश्चित मानले जात होते. कॉँग्रेसचे 9, शिवसेना (उबाठा) चे 7, समाजवादी पक्षाचे 2 आणि 1 अपक्ष नगरसेवक असे आघाडीचे भक्कम संख्याबळ होते. मात्र प्रत्यक्ष मतदानात शिवसेना (उबाठा) आणि समाजवादी पक्षातील काही नगरसेवक भाजपाच्या बाजूने वळल्याने हे गणित पूर्णपणे उलटे झाले.स्थानिक आमदार गजानन लवटे आणि खासदार बळवंतभाऊ वानखडे यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेरच्या क्षणी शिवसेना (उबाठा) गट भाजपाला अप्रत्यक्ष पाठिंबा देत असल्याचे स्पष्ट झाल्याने राजकीय समीकरणे बदलली.

### चुरशीची लढत; कॉँग्रेसची माघार

उपनगराध्यक्षपदासाठी भाजप, शिवसेना (उबाठा) आणि शिवसेना (शिंदे गट) या तिन्ही पक्षांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र समन्वय न झाल्याने कॉँग्रेसचे उमेदवार शोएब खान (युसुफ खान) यांनी शिवसेना (उबाठा) चे उमेदवार सुयोग खाडे यांच्या समर्थनार्थ आपला अर्ज मागे घेतला. त्यामुळे लढत अधिकच चुरशीची झाली.

### अभद्र युती’ची शहरात जोरदार चर्चा

या निवडणुकीनंतर अंजनगाव सुर्जी शहरात भाजप आणि शिवसेना (उबाठा) यांच्यातील तथाकथित ‘अभद्र युती’ चर्चेचा विषय ठरली आहे. शिवसेना (उबाठा) चे 6 नगरसेवक आणि समाजवादी पक्षाचे 2 नगरसेवक भाजपाच्या बाजूने वळल्याने संपूर्ण राजकीय चित्र पालटले. या घडामोडीमागे आमदार गजानन लवटे यांच्या मुलाचा नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीतील पराभव कारणीभूत असल्याची चर्चा आहे. तसेच ‘मनी फॅक्टर’नेही मोठी भूमिका बजावल्याचा संशय नागरिकांमधून व्यक्त होत असून, या प्रकारामुळे राजकारणाची पातळी घसरल्याची टीकाही होत आहे.

### पक्षाचा आदेश हाच सर्वोच्च- सुयोग खाडे

शिवसेना (उबाठा) चे गटनेते सुयोग खाडे यांना, आपल्या गटातील 6 नगरसेवक व समाजवादी पक्षाचे 2 नगरसेवक आपल्या सोबत नसल्याचे माहीत असतानाही उमेदवारी अर्ज का भरला, असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता त्यांनी स्पष्ट केले, पक्षाचा आदेश हाच आमच्यासाठी सर्वोच्च आहे. त्यामुळेच मी उमेदवारी अर्ज भरला. तसेच महाविकास आघाडीतील धर्म पाळल्याबद्दल कॉँग्रेस पक्षाचेही त्यांनी आभार मानले.

# जाहिरनामा

मी अवधुत नारायण सुने, वय 59 वर्षे, व्यवसाय – मंजूरी, रा. मालखेड रेल्वे, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती, याद्वारे सर्व संबंधितांना व जनतेस कळविण्यात येते की, माझे मूळ खरेदीखत दिनांक 14/02/2017 रोजी, दस्तऐवज क्रमांक 406/2017 अन्वये नोंदणीकृत असून त्याद्वारे मी मौजा मालखेड रेल्वे, नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती येथील ‘शिव-पार्वती विहार’ मधील प्लॉट क्र. 34 हा प्लॉट खरेदी केला आहे.सदर खरेदीखताचा मूळ दस्तऐवज माझ्या ताब्यात होता. मात्र दिनांक 02/01/2026 रोजी मालखेड रेल्वे येथील बसस्टॉप परिसरातून माझे मूळ खरेदीखत गहाळ झाले आहे. मी त्याचा बराच शोध घेतला असता सदर खरेदीखत अद्याप सापडून आलेले नाही.तरी सदर खरेदीखत कोणास सापडल्यास त्यांनी त्वरित माझ्याशी संपर्क साधावा. तसेच, सदर खरेदीखताबाबत कोणताही गैरवापर, व्यवहार, खरेदी-विक्री, तारण, गहाण, हस्तांतरण किंवा अन्य कोणताही कायदेशीर व्यवहार कोणी करू नये. तसे केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित व्यक्तीवर राहील. हा जाहिरनामा मी पुढील कायदेशीर कार्यवाही व संबंधित कार्यालयात (पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे इ.) नोंद करण्यासाठी व आवश्यक प्रतिज्ञापत्र सादर करण्याच्या उद्देशाने प्रसिद्ध करीत आहे.

कोर्ट शिक्का

**आदेशासार**
**( आर. पी. जयस्वाल )**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक



# बालांगण

## सिएरा नेव्हाडा पर्वतरांग

ओळख पर्वतांची

सिएरा नेव्हाडाही जगातील प्रसिद्ध पर्वतरांगांपैकी एक आहे. कॅलिफोर्निया आणि नेवाडा या दोन राज्यांमधून ही पर्वतरांग जाते. नेव्हाडा या शब्दाचा अर्थ बर्फाने झाकलेले पर्वत असा होतो. खरोखरच या रांगेतील उंच शिखरांवर वर्षभर पांढरा बर्फ असतो.माउंट व्हिटनीहे या पर्वतरांगेतील सर्वात उंच शिखर आहे. हे शिखर अमेरिकेतील सर्वात उंच पर्वतांपैकी एक मानले जाते. या पर्वतरांगेतून अनेक ओढे आणि नद्या उगम पावतात. बर्फ वितळल्यावर तयार होणारे पाणी आसपासच्या राज्यांना पिण्यासाठी व शेतीसाठी वापरले जाते. सिएरा नेव्हाडाच्या उत्तरेकडील भागातून बर्फ वितळून सॅक्रामेंटो नदी तयार होते. कॅलिफोर्नियातील ही सर्वात महत्त्वाची नदी मानली जाते.अमेरिकन नदी,ट्रकी नदी,वॉकर नदी,कार्सन नदी, किंग्ज नदी यासारख्या अनेक महत्वाच्या नद्या सिएरा नेव्हाडा पर्वतरांगेतउगम पावतात. त्यामुळे ही पर्वतरांग पाण्याचा मोठा स्त्रोत मानली जाते.हवामान थंड असल्यामुळे येथे जायंट सिक्रॉया,पाईन, सिडार,ज्युनिपर,ओक यासारखी काटेरी पाने असलेली किंवा बर्फ सहन करणारी झाडे आढळतात. असतात. तर काळी अस्वले, हरणे, लांडगे, कोल्हे, गरूड, असे विविध प्राणी सिएरा नेव्हाडातील जंगलात आढळतात. उंच डोंगर उतारांवर कधीकधी बर्फात खेळणारे छोटे प्राणीही दिसतात. येथील उंच भागात वर्षभर गार वारा असतो. हिवाळ्यात बर्फवृष्टी मोठ्या प्रमाणात होत असल्याने लोक स्कीईंग, बर्फात घसरत खेळणे, अशा खेळांचा आनंद घेतात. उन्हाळ्यात तापमान मध्यम असते.त्यामुळे पर्यटक, प्रवासी आणि पर्वत चढाई करणारे लोक मोठ्या प्रमाणात येतात.सिएरा नेव्हाडा भागात नैसर्गिक तलावही प्रसिद्ध आहेत. त्यातील लेक टाहो हा अतिशय सुंदर आणि जगभरातील पर्यटकांना आकर्षित करणारा



तलाव आहे. निळसर पाण्याने भरलेला हा तलाव उंच पर्वतांनी वेढलेला असल्यामुळे अधिक मोहक दिसतो.ही पर्वतरांग नैसर्गिक संपत्ती, जंगलांचे रक्षण, पाण्याचा पुरवठा आणि पर्यटन या सर्वांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळेच सिएरा नेव्हाडा हे अमेरिकेतील एक खास आणि अद्भुत नैसर्गिक स्थळ मानले जाते.

## बना सोशल मिडिया मॅनेजर

कोण होणार?

सध्या सगळीकडे सोशल मिडियाचा जबरदस्त प्रभाव आहे. वेगवेगळ्या क्षेत्राले लोक सोशल मिडियावर असतात. सोशल साईटवर उत्पादनांचं प्रमोशन केलं जातं. म्हणूनच सोशल मिडिया स्पेशलिस्ट किंवा सोशल मिडिया मॅनेजर म्हणून तुम्ही करीअर करू शकता. जगातल्या लोकसंख्येत युवावर्ग खूप मोठा आहे. तरुणमंडळींना सोशल मिडिया खूप आवडतो. म्हणूनच तरुणांशी संवाद साधण्याचं, त्यांच्यापर्यंत आपलं उत्पादन पोहोचवण्याचं प्रभावी साधन म्हणून सोशल मिडियाकडे पाहिलं जातं. कंपनीच्या उत्पादनांचं कमीत कमी शब्दात प्रभावी वर्णन करून लोकांना त्याच्या प्रती आकर्षित करण्याचं काम सोशल मीडिया मॅनेजर करतो. कंपनी आणि ग्राहक यांच्यातल्या संवादाचं माध्यम म्हणजे सोशल मिडिया मॅनेजर.

सोशल मिडिया स्ट्रॅटेजिस्ट म्हणूनही तुम्ही काम करू शकता. हा स्ट्रॅटेजिस्ट कंपनीची मार्केटिंग मोहीम सांभाळतो तसंच कंपनीचं सोशल मिडिया अकाउंट सांभाळण्याची जबाबदारीही त्याच्यावर असते. सोशल मिडियावर अनेक सेलिब्रिटी असतात. या सेलिब्रिटींच्या सोशल अकाउंटचं व्यवस्थापन करण्याची जबाबदारी सोशल मिडिया मॅनेजरवर असते. या क्षेत्रात काम करण्यासाठी तुम्हाला सोशल मिडियाचं



सखोल ज्ञान असणं गरजेचं आहे. शिवाय नव्या तंत्रज्ञानाची ओळख असायला हवी. सतत काही तरी नवं शिकत राहायची इच्छा असायला हवी. या क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी आहेत. विविध संस्था सोशल मिडियाशी संबंधित अभ्यासक्रमही चालवतात. असे अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही तुमच्या आवडीच्या क्षेत्रात करीअर करू शकता.

## हत्तींचे माणसाशी नाते

हत्ती हा प्राणी खूप रुबाबदार दिसतो. आपले मोठाले कान पंख्यासारखे हलवीत सोंड डौलदारपणे खाली वर करत बारीक डोळ्यांनी बघणारा हत्ती पहायला तुम्हाला आवडतं खरे ना? त्याच्या पाठीवरच्या अंबारीत बसून चक्कर मारायची संधी मिळाली तर आणखी आनंद होते. पण एखाद्या मोठ्या उद्यानात गेल्याशिवाय अशी संधी क्वचित्च मिळत असते. पूर्वीच्या काळी कोल्हापूरचे शाहूराजे होते त्यांनी असे दहा-



बारा हत्ती पाळले होते.

जाणून घ्या

त्या हत्तींसाठी खास मोठी घरे बांधली होती त्यांना 'पीलखाना' म्हणत असत.

शाहूमहाराजांचे हत्तींवर फार प्रेम होते. त्यामुळे ते या हत्तींची खूप चांगली देखभाल करत असत. त्यासाठी नोकर-चाकर होतेच पण रानटी हत्तींना काबूत ठेवण्यासाठी, त्यांना माणसाळून शिकवण्यासाठी खास माहुत ठेवले होते. या गोष्टीचे ज्ञान त्याकाळी माहुताप्रमाणे राजालाही असणे आवश्यक होते. असा दंडक होता. कारण अगदीपूर्वी युद्धात सुद्धा हत्तींचा उपयोग होत होता.

शाहूमहाराजांकडे जे दहा-बारा हत्ती होते त्यातले चार-पाच हत्ती फार देखणे होते. महाराजांनी त्यांची नावे 'गजराज', 'मोती', 'रामप्रसाद' व 'यशवंत' अशी होती. दसरा, दिवाळी अशा मोठ्या सणावारी या हत्तींना भरजरी वस्त्रे घालून व सोन्याम त्यांचे दागिने घालून त्यांनी रस्त्यावरून मिरवणूक काढली जायची. तेव्हा हत्ती इतके देखणे दिसत की हा भव्य मिरवणूक सोहळा लोक पहातच रहात असत! कोल्हापूरमध्ये अशा ताकदवान हत्तींशी खेळणे या धाडसी खेळाला 'साटमारी' असे म्हणत. त्यासाठी दगडी गोलाकार उंच भिंती बांधलेल्या होत्या, त्या आजही कोल्हापूर शहरात पहायला मिळतात. खासबाग, राधानगरी, पन्हाळा, सोनतळी या चार ठिकाणी या साटमारी पहायला मिळत! तसा हत्ती हा प्राणी लोकप्रिय आहे. कारण तो बुद्धीमान प्राणी आहे. माणसाच्या मनातल्या भावना व विचार त्याला आपोआप समजतात. एकदा एक गोष्ट अशी घडली, की एका माणसाला हत्तीवर बसायचे होते, पण तो घाबरला आणि हत्तीविषयी वाईट विचार त्याच्या मनात आले. हत्ती या माणसाला मुळीच अंबारीत बसू देईना. शेवटी माहुताने कारण ओळखले व त्या माणसाला सांगितले, 'लगेच हत्तीची क्षमा माग!' त्याप्रमाणे त्या माणसाने क्षमा मागताच लगेच हत्तीने त्याला अंबारीत चढू दिले. उगीच नाही म्हणत बरं का हत्तीला गजराज! १२० वर्षांचे आयुष्य त्याला असते. लक्ष्मी देवतेच्या पाठीमागे हत्तीचे चित्र नेहेमी पहाता ना तुम्ही? गणपतीबाप्पांनाही हत्तीचेच तोंड आहे!

## फेसबुक हॅक होऊ नये म्हणून




स्मार्ट टिप्स

तुमच्यापैकी अनेकजण फेसबूक वापरत असतील. युजरच्या सुरक्षेसाठी फेसबूक बरंच काही करत असलं तरी अकाउंट हॅक केलं जातं. हॅकर्स फेसबूक अकाउंट कसा प्रकारे हॅक करतात हे जाणून घेऊया...

**फिशिंग अटॅक**

'फिशिंग अटॅक' या पद्धतीने हॅकर्स फेसबूक अकाउंट हॅक करू शकतात. यासाठी हॅकर्स फेक म्हणजे खोटं लॉग इन पेज तयार करतात. ते खऱ्या फेसबूक पेजसारखं दिसतं. हॅकर्स युजर्सना त्यावर लॉग इन करायला सांगतात. यामुळे युजर आयडी आणि पासवर्ड सेव्ह होतो. ही टेक्स्ट फाईल डाउनलोड केल्यावर तुमचं अकाउंट हॅक होतं.

**कसा करायचा बचाव?**

फिशिंग अॅटॅकमध्ये अडकू नये यासाठी दुसऱ्याच्या पीसी किंवा लॅपटॉपमधून फेसबूक अकाउंट ओपन करू नका. फेसबूक ओपन करण्यासाठी कायम क्रोम ब्राउजरचा वापर करा. फेसबूक अकाउंटमध्ये लॉग इन करायला सांगणाऱ्या ई मेलकडे दुर्लक्ष करा.

**की लॉग इन**

की लॉग इन ही फेसबुक अकाउंट हॅक करण्याची सोपी पद्धत आहे. 'की लॉगर' हा छोटासा प्रोग्राम आहे. हा प्रोग्राम कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपमध्ये इन्स्टॉल केला की तुमची सगळी माहिती त्यात साठते. यानंतर एफटीपी किंवा ई मेलच्या माध्यमातून ही माहिती पाठवली जाते.

**कसा करायचा बचाव?**

साईट विश्वासार्ह असेल तरच सॉफ्टवेअर डाउनलोड करा. युएसबी ड्राईव्ह स्कॅन करून घ्या. कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप मध्ये अँटीव्हायरस सॉफ्टवेअर टाकून घ्या.

आपण पीसीच्या ब्राउजरमध्ये पासवर्ड सेव्ह करून ठेवतो. यामुळे हॅकर्सना तुमचं अकाउंट हॅक करणं सोपं जातं तसंच मोबाईल फोनमधूनही फेसबूक हॅक करता येतं. फोनच्या माध्यमातून फेसबूक वापरत असाल तर जास्त काळजी घ्या. नको असलेली अॅप्स इंस्टॉल करू नका.

## उपयुक्त चांदी



खनिजांची माहिती

चांदी हा पृथ्वीतील एक सुंदर, चमकदार आणि उपयुक्त धातू आहे. तिचा रंग पांढराच कदार असतो.चांदी खूप मऊ आणि लवचिक असते. प्राचीन काळापासून लोक चांदीचा वापर दागिने, नाणी, घरगुती वस्तू आणि पूजा-साम्रुग्री बनवण्यासाठी करत आले आहेत. चांदी पृथ्वीच्या खोल थरांमधील खडकांमध्ये मिळते. ती अनेक वेळा तांबे, शिसे आणि जस्त यांच्यासोबत मिसळलेली असते. अनेक नद्यांच्या वाळूतही चांदीचे छोटे चमकदार कण आढळून येतात.

चांदी शोधण्यासाठी भूवैज्ञानिक आधी जमिनीचा अभ्यास करतात. मग खडकांमध्ये कुठे चांदी मिसळलेली आहे ते ठरवल्यावर खाणकाम करणारे कामगार मोठ्या मशिनने खडक तोडतात. या तुटलेल्या दगडांमध्ये चांदीचे कण असतात. त्यांना बाहेर काढून त्या खडकांचे छोटे तुकडे करतात. त्यानंतर हे तुकडे आणखी बारीक करून एकसारखी पूड तयार केली जाते. ही पूड पाण्यात मिसळून एक द्रव मिश्रण बनवले जाते. चांदी जड असल्यामुळे ती खाली बसते. वरचे पाणी आणि हलके दगडाचे तुकडे वेगळे काढले जातात.

त्यानंतर चांदी अजून शुद्ध करण्यासाठी तिला खूप उष्ण तापमानावर गरम केले जाते. गरम केल्यावर इतर धातू वितळतात आणि हलकी चांदी वर तरंगते. वरची चांदी वेगळी केली जाते आणि थंड करून त्यापासून छोट्या छोट्या पट्ट्या, बार किंवा दागिने बनवण्यासाठी लगडीबनवल्या जातात. ही चांदी अजून शुद्ध करण्यासाठी पुन्हा गरम करणे आणि अशुद्धता वेगळ्या करणे असे काही टप्पे करावे लागतात. शुद्ध चांदीची चमक खूपच तेजस्वी असते.चांदी काळी पडू नये म्हणून तिच्यावर खास थर दिला जातो.

## स्वामी विवेकानंदांचं बालपण

स्वामी विवेकानंदांची जयंती (१२ मे) राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरी केली जाते. त्यानिमित्त या थोर बुद्धीमान, तत्वज्ञानी व्यक्तिबद्दल जाणून घेऊया. ते बालपणी कसे होते?



प्रेरणा

त्यांना आज आपण स्वामी विवेकानंद या नावाने ओळखत असलो तरी त्यांचे खरे नाव नरेंद्र असे होते. त्यांचे वडील व्यवसायाने वकील होते. आई भुवनेश्वरीदेवी वृत्तीने धार्मिक आणि बुद्धीमान होती. तिने नरेंद्रवर बालपणीउत्तम संस्कार केले होते. बाल नरेंद्र लहानपणापासून अत्यंत श्रद्धाळू वृत्तीचे होते. त्याबद्दलची एक कथा सांगतात, बाल नरेंद्र लहानपणी आईबरोबर कीर्तन ऐकायला जात असत. असेच एके दिवशी ते कीर्तनाला गेले असताना कीर्तनकाराने हनुमान या देवाचे कीर्तन केले आणि 'हनुमान हा चिरंजीव म्हणजेच अमर आहे' असे सांगितले. ते ऐकून बाल नरेंद्राला हनुमानाबद्दल अत्यंत भक्ती निर्माण झाली आणि त्याला पाहण्याची उत्सुकताही वाटू लागली. कीर्तन संपल्यावर ते कीर्तनकाराकडे गेले आणि उत्सुकतेने विचारले, 'आपण आत्ता सांगितल्याप्रमाणे हनुमानाला केळी आवडतात ना? मग मी जर केळीच्या झाडापाशी त्यांची वाट बघितली तर ते मला भेटण्यासाठी येतील का?' हा प्रश्न ऐकूनकीर्तनकारांना हसू आले पण या छोट्या मुलाला नाराज करु नये म्हणून त्यांनी 'होय' असे उत्तर देऊन टाकले. झाले, नरेंद्र लगेच देवळाजवळच्या एका केळीच्या झाडाखाली जाऊन बसला. चार-पाच तास झाले तरी त्याला हनुमान काही भेटले नाहीत. पण नरेंद्र जागचा हलला नाही. शेवटी, इतका वेळ हा मुलगा कुठे गेला म्हणून आईच त्याला शोधीत केळीच्या झाडाखाली आली. तिला नरेंद्रची इच्छा कळली तशी तिने मोठ्या युक्तीने त्यांची समजूत घातली. 'हे बघ, आज प्रभू रामरायांचे काही महत्त्वाचे काम निघाले असेल, ते करण्यासाठी हनुमंतराव गेले असतील. म्हणून इथे आले नसतील. सवडीने ते नक्की येतील!' हे पटल्यावर नरेंद्र घरी जायला तयार झाले.

## आग लागली असता

कोणत्याही आपत्तीचा सामना करण्यासाठी आपण सज्ज असायला हवं. कोणती दुर्घटना कधी घडेल याचा काहीच नेम नसतो. आता आगीचंच बघा. छोट्याशा चुकीमुळे आग लागू शकते. दिवाळीत फटाके फोडले जातात, पणत्या लावल्या जातात. अशा वेळी आग लागण्याची शक्यता अनेकपटींनी वाढते. दिवाळीतच नाही तर इतर वेळीही काळजी घेणं गरजेचं असतं. आग लागली तर कोणती काळजी घ्यावी याविषयी...



टेक केअर

* आग लागल्यास लायटर, गॅस, मेणबत्ती, दिवा, पणती यापासून लांब रहा.
* दिवा, मेणबत्ती यापासून कपडे लांब ठेवायला हवेत. कपड्यांना लवकर आग लागते. तुमच्या बाबतीत असं घडलं तर घाबरू नका. मुख्य म्हणजे पळू नका. जमिनीवर झोपा. तोंड हातांनी झाकून घ्या आणि लोळा. यामुळे कपड्यांना लागलेली आग विझेल.
* आग लागलेली असताना तुम्ही घराच्या एखाद्या खोलीत असाल आणि दार बंद असेल तर लगेच दार उघडू नका. दाराच्या फटींमधून धूर येत आहे का, ज्वाळा दिसत आहे का ते पहा. दाराच्या पलीकडे आग लागली आहे का, हे तपासून घ्या. फटीतून धूर दिसत असेल तर दार उघडू नका.
* धूर दिसला नाही तर दाराला हात लावून बघा. दार खूप गरम लागलं तर थांबा. दार उघडू नका.
* दार गरम लागलं नाही तर हॅंडलला हात लावून बघा. हॅंडल गरम लागत असलं तरी दार उघडू नका.
* दाराखालून धूर येत नसेल, दार आणि हॅंडल थंड असेल तर दार किलकिलं करून बघा. दार उघडल्यावर अचानक धूर आला किंवा ज्वाळा दिसल्या तर लगेच बंद करा.
* ज्वाळांपेक्षाही धूर आणि घातक वायूंमुळे जास्त त्रास होतो. आग लागली तर जमिनीवर झोपा. धुरापासून लांब रहा.
*अग्निशमन दलाचे जवान तुम्हाला वाचवण्यासाठी येतील. तोपर्यंत धीर धरा. घाई करू नका. घरात किंवा इमारतीत संकटकाळी बाहेर पडण्याचा मार्ग असेल तर त्याचा वापर करा.
*मोठ्यांनी दिलेल्या सूचना ऐका. त्यांचं पालन करा.

## ए आय खरेच विचार करतो का ?

आपण रोज मोबाईल वापरतो. व्हिडिओ पाहतो.गेम खेळतो. गुगलला प्रश्न विचारतो. कधी कधी असे वाटते की समोरचे आय प्रयुक्त उपकरण आपल्यासारखाच विचार करून उत्तर देते आहे. पण खरंच तसे असते का?ए आयविचार करतो का?



रंजक विज्ञान

त्यासाठी विचार करणे म्हणजे काय, हे आधी समजून घेऊ या. आपण एखादी गोष्ट पाहतो. ऐकतो.ती आठवतो.एखादी गोष्ट चूक किंवा बरोबर आहे ते आपण ठरवतो. आपल्या मनात आनंद, भीती, राग, शंका अशा भावना निर्माण होतात. हे सगळे मेंदूमुळे होते. ए आयकडे मात्र भावना नसतात.इच्छा नसतात. स्वतःचे मत नसते. ए आयम्हणजे एक अतिशय हुशार संगणक प्रोग्राम आहे. त्याला प्रचंड प्रमाणात माहिती दिलेली असते. लाखो पुस्तके, वेबसाईट्स, चित्रे, आवाज यावरून तो शिकलेला असतो. आपण प्रश्न विचारला की तो त्या माहितीमधून योग्य उत्तर शोधतो. हे सगळे खूप वेगाने होते.म्हणून आपल्याला वाटते की तो विचार करतोय.

पण ए आयस्वतःहून काहीही विचार करत नाही. आपण काही विचारले, आदेश दिला तरच तो काम करतो. त्याला हे समजत नाही की दिलेले उत्तर बरोबर आहे की चूक आहे. एखादी गोष्टचांगली आहे की वाईट आहे. तो फक्त आकडे, शब्द आणि पॅटर्न ओळखतो. उदाहरणार्थ, ए आयला आई या शब्दाची भावना कळत नाही.

## रोबो नाचणारा, गाणारा

वेगवेगळ्या कामांसाठी रोबोंचा वापर केला जातो. रोबोंमुळे माणसांवरचा ताण कमी होणार आहे. घरची कामं करण्यासाठी रोबो उपयुक्त ठरत आहे. सध्या कुरी नावाच्या रोबोची चर्चा आहे. हा रोबो लोकांच्या करमणुकीसाठी तयार करण्यात आला आहे. तो गाणं म्हणतो, नाच करतो. मेफिल्ड रोबोटिक्सने हा रोबो तयार केला आहे. कुरीचा एक व्हिडिओही त्यांनी शेअर केला आहे. यात तो नाचताना दिसत आहे. नाचताना तो पुढे सरकतो आहे. तसंच धमाल गाणंही म्हणत आहे.



स्मार्ट गॅजेट्स

छोटासा, गोंडस असा हा रोबो आहे. कुरीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. शिवाय त्यात नवं हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर अपडेट करण्यात आलं आहे. यात व्हर्च्युअल असिस्टंट मोबाईल एंटरटेनमेंट डिव्हाइस बसवण्यात आलं आहे. यात गाणी ऐकण्यासाठी ब्लू टूथ स्पीकर्स बसवण्यात आले आहेत. हा कुरी व्हिडिओ रेकॉर्डिंगही करेल. व्हिडिओसाठीचं खास फीचर यात बसवण्यात आलं आहे. त्यामुळे घरात पार्टी असो किंवा कोणताही सण, कुरी सगळं काही रेकॉर्ड करेल. या कुरीसोबत तुम्ही नाचू शकता. गाऊ शकता. लवकरच तो बाजारात उपलब्ध होणार आहे. तो एखाद्या खेळण्यासारखा दिसतो.

खादाडी

### यमी काकडी सॅंडविच



दुपारच्या वेळी काय खावं, असा प्रश्न तुम्हाला पडतो. अशा वेळी हेल्दी काकडी सॅंडविच ट्राय करता येईल. यासाठी पाऊण कप चीझ, काकडी, बटर आणि ब्रेड असे पदार्थ लागतील. सॅंडविच बनवण्यासाठी तुमच्या ब्रेड स्लाईसला बटर लावा. त्यावर चीझ पसरा. आता काकडी कापून घ्या. काकडीचे तुकडे ब्रेडवर ठेवा. दुसऱ्या ब्रेडलाही बटर आणि चीज लावा. हा ब्रेड आधीच्या ब्रेडवर ठेवा. मस्त काकडी सॅंडविच खा.

स्टाईल

### असा निवडा चष्मा



चष्मा लावणं हे आता स्टाईल स्टेटमेंट झालं आहे. त्यामुळे चष्मा निवडताना त्याची फ्रेम आणि डिझाइन यावर भर द्यायला हवा. चष्मा निवडताना तुम्ही स्वतः जा. तुमच्या चेहऱ्याला कोणती फ्रेम शोभून दिसते हे बघा. चष्म्याची खरेदी ऑनलाईनही करता येते. चष्म्याची काळजीही घ्यायला हवी. काचेवर धूळ साठणार नाही याकडे लक्ष द्या. चष्मा नेहमी मऊ कापडाने पुसा. डाग नीट स्वच्छ करा.

परंपरा

### वाराणसीचा त्रिपुरोत्सव



भारत हा परंपरांचा देश आहे. आपल्याकडे सण सारखेच असले तरी ते साजरा करण्याची पद्धत राज्यानुसार बदलत जाते. वाराणसीमध्ये दिवाळीनंतर 'देव दिवाळी'चा उत्सव साजरा केला जातो. याला त्रिपुरोत्सव असंही म्हटलं जातं. दिवाळीनंतर पंधरा दिवसांनी हा उत्सव साजरा केला जातो. कार्तिक महिन्यातल्या पौर्णिमेला या सोहळ्याचं आयोजन केलं जातं. शंकराने त्रिपुरासुराचा वध केला. ही घटना त्रिपुरोत्सवाच्या माध्यमातून साजरी केली जाते. या दिवशी भाविक मोठ्या संख्येने वाराणसीला येतात.

दोस्त हे मस्त

### ब्राझिलियन तापीर



ब्राझिलियन तापीर हा गेंड्याच्या कुटुंबातला प्राणी आहे. तो दक्षिण अमेरिकेतल्या घनदाट जंगलांमध्ये आढळतो. हा प्राणी पाण्याजवळ राहतो. त्याला पोहता येतं. शत्रूपासून बचाव करण्यासाठी हे प्राणी अनेकदा पाण्यात जाऊन लपतात. या प्राण्याची मोठ्या प्रमाणावर शिकार झाली आहे. त्यामुळे त्यांची संख्या कमी होत आहे. ही प्रजाती वाचवण्यासाठी प्रयत्न होत आहेत.

# विकास धोरणांना जनतेची पावती

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :



महाराष्ट्रातील सर्व २९ महानगर पालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये भाजप-शिवसेना महायुतीला मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आनंद व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, चंद्रशेखर बावनकुळे तसेच महायुतीतील सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले आहे.

या निवडणूक निकालांमधून राज्यातील जनतेने स्थैर्य, विकास आणि सक्षम प्रशासनाला प्राधान्य दिल्याचे स्पष्ट झाले असून भाजप-शिवसेना महायुतीवर जनतेने पुन्हा एकदा ठाम विश्वास व्यक्त केला असल्याचे गडकरी यांनी नमूद केले.

महापालिका निवडणुकांतील हा कौल केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांपुरता मर्यादित नसून, राज्यातील एकूणच राजकीय वातावरण आणि विकासाभिमुख धोरणांना मिळालेली पावती असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महायुती सरकारने गेल्या काही वर्षांत पायाभूत सुविधा, रस्ते, वाहतूक, शहरी विकास, स्वच्छता, पाणीपुरवठा तसेच नागरिकाभिमुख सेवा यांवर भर दिला असून, त्याचे सकारात्मक प्रतिबिंब या निकालांमध्ये उमटले असल्याचे गडकरी म्हणाले.

जनतेने विकासाच्या मुद्द्यांवर शिक्कामोर्तब करत विरोधकांच्या नकारात्मक राजकारणाला नाकारले, असेही त्यांनी सूचित केले. या विजयामुळे महायुती सरकारला विकासाच्या मार्गावर अधिक वेगाने वाटचाल करण्याची संधी मिळेल आणि आगामी काळात शहरे अधिक सक्षम, स्मार्ट आणि नागरिकांसाठी सुलभ बनवण्यावर भर दिला जाईल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यक्षम नेतृत्वात महाराष्ट्र प्रगत, औद्योगिकदृष्ट्या सक्षम आणि समृद्ध राज्य म्हणून पुढे जात असल्याचे त्यांनी नमूद केले. या यशामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास अधिक बळकट झाला असून, आगामी काळात जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे, असे आवाहनही गडकरी यांनी केले.

# महायुतीवरील विश्वासातून जनतेचा कौल

**ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्पष्ट मत**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :



भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुंबईसह महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांमधील भाजपचा विजय हा विकास व महायुतीवरील विश्वासाचा असल्याचे मत व्यक्त केले आहे. हे विश्वासाचे मत आहे. विकासाचे मत आहे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे व महायुतीवरील विश्वासाचे मत आहे. भाजप व शिवसेनेची महायुती दोन तृतीयांश बहुमताने व ५१ टक्के व्होट शेअरने मुंबई महापालिकेच्या सत्तेत येईल, असे ते म्हणाले.

मुंबई महापालिकेत भाजप - शिवसेनेला स्पष्ट बहुमत मिळाल्याचे जवळपास स्पष्ट आहे. तब्बल २५ वर्षांनंतर मुंबईवरील ठाकरे गटाची सत्ता संपुष्टात आली आहे. बावनकुळे म्हणाले, केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील फडणवीस सरकार हेच महाराष्ट्राचा विकास करू शकतात हा त्याचा कल आहे. हा कल असाच सुरू राहील. भाजप व शिवसेनेची महायुती दोन तृतीयांश बहुमताने व ५१ टक्के व्होट शेअरने बीएमसीच्या सत्तेत येईल. नागपूर महापालिकेतही जनतेने देवेंद्र फडणवीस व नितीन गडकरी यांच्या विकासाच्या भूमिकेवर मत दिले. विकसित नागपूरला मत दिले आहे. संपूर्ण महाराष्ट्राने विकासाला मत दिले.

महाराष्ट्रात एकूण नगरसेवकांपैकी ५१ टक्के नगरसेवक हे भाजप व महायुतीचे असतील. व भाजपला दोन तृतीयांशहून अधिक बहुमत मिळेल असा आम्हाला विश्वास आहे. मुख्यमंत्री फडणवीसांनी मुंबईच्या विकासाचे व्हिजन तयार केले. एकनाथ शिंदे व त्यांनी विकसित मुंबई करण्याचा प्रयत्न केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने विविध योजनांच्या माध्यमातून मुंबईला पाठबळ दिले. त्यामुळे तेच मुंबईचा विकास करू शकतात अशी लोकांची भावना आहे, असे बावनकुळे म्हणाले.

ते पुढे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी या निवडणुकीची रचना केली. माज्यावरही या निवडणुकीचा प्रभार होता. आम्ही तिघांनीही समन्वय साधून काम केले.

महाराष्ट्राचे सरकार व केंद्रातील मोदी सरकार यांच्या विकासाच्या योजना. तथा संघटनेची भूमिका. ही दोन चाके जोडीने चालली. परिणामी, आमची गाडी १०० च्या स्पीडने निघाली. आम्हाला लातूरमध्ये काहीसे नुकसान सोसावे लागले. तिथे आम्ही २२ जागांवर थांबलो. तिथे काँग्रेस ४० च्या वर गेली. आम्ही यावर चिंतन करू.

बावनकुळे यांनी यावेळी ईव्हीएमला दोष देणाऱ्या ठाकरे बंधूंचाही समाचार घेतला. ज्या ठिकाणी राज व उद्धव ठाकरे यांचे उमेदवार निवडून आले तिथे ईव्हीएम चांगल्या होत्या. स्पेशल होती. आम्ही जिथून निवडून आलो तिथे बोगस होती. हे लोकांना पटत नाही. लोकांना विकास पटतो. महाराष्ट्रात पुढे केवळ विकासाचे राजकारण होईल, असे ते म्हणाले.

## बंडखोराने चारली आजी-माजी शहराध्यक्षांना पराभवाची धूळ

■ महासागर प्रतिनिधी,चंद्रपूर, दि. १६ :
काँग्रेसचे माजी चंद्रपूर शहर जिल्हाध्यक्ष नंदू नागरकर यांची महाकाली प्रभागातून तिकीट कापून त्यांचे राजकारण संपविण्याचे षडयंत्र रचणाऱ्या खा. प्रतिभा धानोरकर, काँग्रेस जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे यांना बंडखोर नागरकर यांनी चांगलीच चपराक दिली आहे.

स्वतः विजय संपादन करित काँग्रेसचे शहर अध्यक्ष संतोष लहामगे, माजी शहर अध्यक्ष रामू तिवारी या दोघांचा येथे पराभव झाला. तर खासदार धानोरकर यांचे खंदे समर्थक सोहेल शेख यांचा एकोरी प्रभागातून पराभव झाला. नंदू नागरकर यांनी तिकीट नाकारल्यानंतर खम ठोकत विजय संपादन केला.

## मुख्यमंत्र्यांच्या मामेभावासह आमदार बंधू पराभूत

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १६ :



अमरावती महानगरपालिकेत भाजपला दोन मोठे धक्के बसल्याने शहराच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ विवेक कलोती आणि आमदार श्रीकांत भारतीय यांचे भाऊ तुषार भारतीय या दोन्ही महत्त्वाच्या नेत्यांचा पराभव झाला आहे.

प्रभाग क्रमांक १४ मधील निकाल भाजपसाठी विशेष धक्कादायक ठरले आहेत. या प्रभागातून काँग्रेसने क्लीन स्वीप साधत चारही जागा जिंकल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ विवेक कलोती यांचा याच प्रभागात पराभव झाला आहे.

काँग्रेसच्या विजयामुळे मतमोजणी केंद्राबाहेर कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. फटाके, घोषणा आणि ढोल-ताशांच्या गजरात काँग्रेस समर्थकांनी या विजयाचं जोरदार सेलिब्रेशन केलं. भाजपसाठी हा निकाल अनपेक्षित मानला जात असून, सुरुवातीच्या फेरीतच सत्ता समीकरणांवर परिणाम होण्याची चिन्हं दिसू लागली आहेत.

प्रभाग क्रमांक १४ अ मधील निकालांचा तपशील पाहिला तर काँग्रेसच्या उमेदवारांनी भाजपवर स्पष्ट आघाडी घेतल्याचं दिसून येतं. विलास इंगोले यांनी भाजपचे अविनाश देऊळकर यांचा १२,२१७ विरुद्ध ४९३४ मतांनी पराभव केला. सुनीता भेले यांनी संगीता बुरंगे यांचा ७३९७ विरुद्ध ३७७० मतांनी पराभव केला.

सुशीला रतावा यांनी गंगा खारकर यांच्यावर ८६२५ विरुद्ध ५९५६ मतांची आघाडी घेत विजय मिळवला. तर संजय शिरभाते यांनी भाजपचे विवेक कलोती यांचा ५६४५ विरुद्ध ४७२६ मतांनी पराभव करत भाजपला मोठा धक्का दिला आहे.

आमदार श्रीकांत भारतीय यांचे भाऊ तुषार भारतीय पराभूत

दुसरीकडे, साई नगर प्रभागातील निकालांनीही भाजपच्या अडचणी वाढवल्या आहेत. या प्रभागात भाजपचे नेते तुषार भारतीय यांचा पराभव झाला आहे. आमदार श्रीकांत भारतीय यांचे भाऊ असलेल्या तुषार भारतीय यांच्याकडून भाजपला मोठी अपेक्षा होती. मात्र रवी राणांचे निकटवर्तीय आणि युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार सचिन भेंडे यांनी विजय मिळवत बाजी मारली आहे. साई नगरमधील ही निवडणूक आमदार रवी राणांनी प्रतिष्ठेची बनवली होती. त्यामुळे या निकालाला स्थानिक राजकारणात विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे.

## तुतारी वाजलीच नाही

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :



नागपूर महानगरपालिकेत भाजपाने जोरदार मुसंडी मारली असून, १५१ पैकी १०९ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळविले. येथे काँग्रेस ३७ जागा जिंकत दुसऱ्या स्थानी राहिली. तथापि, स्वबळावर लढणाऱ्या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची पार धुळधाण झाली आहे. त्यांच्या पक्षाला भोपळाही फोडता आला नाही.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीमध्ये लढलेल्या शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसला फारसे यश मिळाले नाही. नुकत्याच झालेल्या नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीतही हा पक्ष विदर्भात पिछाडीवरच राहिला. आता महानगर पालिकेच्या निवडणुकीतही या पक्षाची घसरण झाली आहे. नागपूर मनपामध्ये शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसने काही मोजक्या जागांवर उमेदवार दिले होते. तथापि, प्रचारादरम्यान, या पक्षाचा एकही बडा नेता येथे फिरकला नाही. पक्षाकडून उमेदवारांना पुरेशी रसद मिळाली नसल्याचे सांगण्यात येते. शिवाय, तुल्यबळ उमेदवार दिले नाहीत. भाजपाच्या झंझावातात शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार तग धरू शकले नाहीत आणि सर्वच उमेदवारांना पराभवाचे तोंड पाहावे लागले. नागपूरमध्ये शुन्य नगरसेवक हा पक्षासाठी मोठा झटका मानला जात आहे.

# अकोला महानगरपालिकेत भाजपला धक्का

### स्वबळावर सत्ता अशक्य : भाजप ३८ वरच अडखळले : युतीअभावी मतविभाजनाचा फटका

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १६ :
अकोला महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल जाहीर होताच शहराच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

एकूण ८० जागांच्या सभागृहात भाजपला केवळ ३८ जागांवर समाधान मानावे लागले असून, स्वबळावर सत्ता स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या ४१ या बहुमताच्या आकड्यापासून भाजप तीन जागांनी दूर राहिला आहे. २०१७ मध्ये स्वबळावर सत्ता स्थापन करणाऱ्या भाजपला यंदा इतर पक्षांवर अवलंबून राहावे लागणार आहे.

**युती नसल्याचा फटका**

भाजप आणि शिवसेना वेगवेगळी लढल्यामुळे अकोल्यात भाजपला मोठा फटका बसल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. चाळीसच्या पुढे सहज जाऊ शकणारा भाजप मतविभाजनामुळे अनेक प्रभागांमध्ये पिछाडीवर पडला. शिवसेनेसोबत युती नसल्याने भाजपच्या पारंपरिक मतांमध्ये फूट पडली आणि त्याचा थेट फायदा काँग्रेस, वंचित, एमआयएमसह इतर पक्षांना झाला.

**दिग्गजांचा पराभव भाजपसाठी धक्कादायक**

या निवडणुकीत भाजपचे अनेक प्रस्थापित नगरसेवक पराभूत झाले. भाजपचे अजय शर्मा, सागर शेगोकार यांना पराभव पत्करावा लागला. माजी उपमहापौर मापारी यांच्या पॅनलमधील भाजपचे दोन उमेदवारही निवडणुकीत अपयशी ठरले.

भाजप-राष्ट्रवादी (अजित पवार) युतीतून उभे असलेले अजय शर्मा आणि संगिता भरगड यांचाही पराभव झाला.

वंचित बहुजन आघाडीचे निलेश देव यांनी भाजपचे सागर शेगोकार यांना पराभूत केले. भाजपमधून निलंबित आशिष पवित्रकार यांनी भाजप उमेदवाराचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला. विशेष म्हणजे अ, ब व क वगार्तून ५०० पेक्षा अधिक मते त्यांना मिळाल्याची नोंद आहे.

| | |
|---|---|
| भाजप | - ३८ |
| काँग्रेस | - २१ |
| उबाठा शिवसेना | - ६ |
| शिंदे शिवसेना | - १ |
| राष्ट्रवादी (अप) | - १ |
| राष्ट्रवादी (शप) | - ३ |
| वंचित आघाडी | - ५ |
| एमआयएम | - ३ |
| महानगर विकास समिती | - १ |
| अपक्ष | - १ |

**सत्तास्थापनेसाठी भाजपसमोर आव्हान**

भाजपला सत्ता स्थापन करण्यासाठी किमान ३ नगरसेवकांची गरज आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे एकमेव नगरसेवक उषा विरक यांचा पाठिंबा मिळाला तरी भाजपला अजून दोन नगरसेवकांची आवश्यकता भासणार आहे. सुनील मेश्राम यांच्या आघाडीकडे केवळ एक नगरसेवक असल्याने भाजपसमोर पर्याय मर्यादित आहेत.

**२०१७ च्या तुलनेत १० जागांचा तोटा**

२०१७ च्या महापालिका निवडणुकीत भाजपने ४८ जागा जिंकत बहुमतापेक्षा सात जागा अधिक मिळवल्या होत्या. यंदा मतमोजणीच्या सुरुवातीला भाजप ४४ जागांवर आघाडीवर होती; मात्र शेवटच्या टप्प्यात ही आघाडी घसरत गेली आणि अंतिम निकालात भाजप केवळ ३८ जागांवर स्थिरावली. परिणामी भाजपला एकूण १० जागांचा तोटा सहन करावा लागला आहे.

**विजयोत्सव व निराशा**

विजयी उमेदवारांच्या कार्यकर्त्यांनी निकाल जाहीर होताच जल्लोषाला सुरुवात केली. फटाक्यांची आतषबाजी, गुलालांची उधळण करत प्रभागांपर्यंत रॅली काढण्यात आल्या. अनेक प्रभागांमध्ये विजयाचा उत्साह ओसंडून वाहताना दिसला. तर दुसरीकडे पराभूत उमेदवारांच्या घरासमोर कार्यकर्त्यांचा जमाव पाहायला मिळाला.

अनेक पराभूत उमेदवार नाराज होत आपल्या घरातच कार्यकर्त्यांसह बसल्याचे चित्र दिवसभर शहरात दिसून आले. अकोल्यात निकालानंतर राजकीय चर्चांना उधाण आले असून सत्तास्थापनेबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. एक दोन दिवसात अकोला मनपात बहुमताचे चित्र स्पष्ट होईल.

## निवडणुकीत लोकशाहीच पुसण्याचे काम..

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १६ :



नगरपालिका आणि नगरपंचायत पाठोपाठ २९ महापालिका निवडणुकांतही विविध गैरप्रकारांना उत आला. बोगस मतदान, पैशाचा महापूर, सत्तेचा गैरवापर, सदोष मतदार याद्यांपासून बोटावरची शाई पुसण्यापर्यंत लोकशाहीच पुसण्याचे काम करण्यात आले. या पाठबळावर सत्ताधारी भाजप, शिंदेसेना आणि अजितदादांची राष्ट्रवादी जिंकली आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.

पक्षपाती निवडणूक आयोग, पोलीस विभाग आणि मुंबई महापालिकेचे आयुक्त, हे अभिनंदनास पात्र आहेत, मुंबईत भाजप-शिंदेसेनेच्या विजयात महापालिका आयुक्तदेखील विजयाचे शिलेदार असल्याची मिश्किल टिपण्णी त्यांनी केली.

## चंद्रपूर महानगरपालिकेवर काँग्रेसचा तिरंगा



**६६ पैकी ३० जागांवर विजय**

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर,दि. १६ :
भारतीय जनता पक्षाच्या डबल इंजिन सरकारच्या विकासाच्या दाव्याला फोल ठरवत चंद्रपूरच्या जनतेने महानगरपालिकेत काँग्रेसला झुकते माप दिले. चंद्रपूर मनपात सर्वाधिक जागेवर विजय मिळवत काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला आहे.

भाजपाला २३ जागेवर समाधान मानावे लागले आहे. चंद्रपूर महानगरपालिकेत काँग्रेस पक्ष २७, भाजपा २३, उबाठा ६, भारतीय शेतकरी कामगार पक्ष ३, वंचित बहुजन आघाडी २, बिएसपी १, एमआयएम १, शिंदे सेना १, अपक्ष २ असे पक्षीय बलाबल आहे. काँग्रेस व समविचारी पक्षाने बहुमत प्राप्त केले आहे. काँग्रेसच्या विजयावर प्रतिक्रिया देताना आ. विजय वडेट्टीवार म्हणाले, भाजपच्या भ्रष्ट धोरणामुळे, फसव्या घोषणा आणि सत्तेच्या अहंकारामुळेच जनतेने भाजपला नाकारले आहे. चंद्रपूरकरांनी विकास, पारदर्शकता आणि जनहितासाठी काँग्रेसवर पुन्हा विश्वास टाकला आहे. भारतीय जनता पक्षाच्या नेत्यामधील आपसी वाद, जुनेच तीनदा, चारदा नगरसेवक असलेले उमेदवार, जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे भाजपाला या निवडणुकीत अपयशास कारणीभूत ठरले आहे.

## युवा स्वाभिमान किंग मेकर

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १६ :
अमरावती महानगर पालिकेत २५ जागांवर विजय मिळवत भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी, १६ जागा जिंकणारा युवा स्वाभिमान पक्ष किंग मेकरच्या भूमिकेत आहे.

८७ सदस्यीय अमरावती महानगर पालिकेत भाजपाला २५ जागा मिळाल्या असून, शिंदेसेना ३, युवा स्वाभिमान १६, राष्ट्रवादी अजित पवार १०, काँग्रेस १५, उबाठा २, बसपा ३, एमआयएम १२ आणि वंचित बहुजन आघाडी १ असे पक्षीय बलाबल आहे.

येथे सर्व पक्ष स्वतंत्ररित्या लढले. तथापि, आता निकालानंतर भाजपा, शिंदेसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी एकत्र येवून सत्ता स्थापन करू शकतात. मात्र, बहुमतासाठी त्यांना युवा स्वाभिमान पक्षाची गरज भासेल. आमदार रवी राणा, माजी खासदार नवनीत राणा यांनी भाजपाविरोधात त्यांच्या पक्षाचे उमेदवार दिले होते. परिणामी, आता यांची युती होते अथवा नाही, हे पाहणे महत्वाचे ठरेल.

# भाजपच्या दोन माजी महापौरांचा पराभव

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर,दि. १६ :





महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत अगदी नवख्या दोन उमेदवारांनी सलग दोन वेळा महापौर राहिलेल्या भाजपच्या राखी कंचर्लावार व अंजली घोटेकर या दोघींचा दारूण पराभव करित धुळ चारली.

विशेष म्हणजे, कंचर्लावार यांच्यासाठी हिंगणघाटचे आमदार समीर कुणावार सलग तीन दिवस प्रभागात ठाण मांडून बसले होते. मात्र, त्यांना कंचलार्वार यांना विजयापर्यंत पोहचविता आले नाही. दरम्यान पहिल्या महापौर काँग्रेसच्या संगीता अमृतकर विजयी झाल्या.

महापालिकेच्या राजकारणात मूळच्या काँग्रेसी आणि महापौर पदासाठी पक्ष बदल करून २०१४ मध्ये भाजपात गेलेल्या राखी कंचर्लावार यांनी सलग दोन वेळा महापौर पद भूषविले आहे. यावेळी वडगाव प्रभागातून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या कंचर्लावार यांच्यासमोर अगदी नवख्या जनविकास सेनेच्या प्रतिक्षा येरगुडे यांनी आवाहन उभे केले.

कंचर्लावार पराभवाच्या छायेत असल्याचे सर्वेक्षणात दिसून येतात शेवटच्या तीन दिवस हिंगणघाटचे आमदार समीर कुणावार प्रभागात ठाण मांडून बसले होते. मात्र आज निकाल लागला तेव्हा नवख्या प्रतिक्षा येरगुडे यांनी कंचर्लावार यांचा पराभव केला. येरगुडे यांना ३५५९ मते मिळाली तर कंचर्लावार यांना २९७१ मते मिळाली.

कंचर्लावार यांचा महापौर पदाचा कार्यकाळ अनियमित कामांनी सर्वत्र गाजला होता. विवेक नगर प्रभागातून माजी महापौर अंजली घोटेकर यांना काँग्रेसच्या नवख्या सुनंदा धोबे यांनी पराभवाची धुळ चारली. मागील काही दिवसांपासून विदेशात वास्तव्याला असलेल्या घोटेकर यांचा प्रभागातील जनसंपर्क कमी झाला. नेमका त्याचाच फायदा धोबे यांनी घेतला आणि विजयश्री खेचून आणली.

धोबे यांना ४ हजार ३९२ मते मिळाली तर घोटेकर यांना ३ हजार ३१२ मते मिळाली. महाकाली प्रभागातून काँग्रेसच्या पहिल्या महापौर तथा उमेदवार संगीता अमृतकर विजयी झाल्या. त्यांनी अपक्ष अरूणा वैरागडे हिचा पराभव केला.

अमृतकर व वैरागडे या तेली समाजातून येतात. तेली व मुस्लीम समाजाचा पाठिंबा मिळाल्यामुळेच त्यांचा विजय झाल्याची चर्चा आहे. वडगांव प्रभागात माजी नगराध्यक्ष तथा अपक्ष सुनीता लोढीया यांचाही पराभव झाला.

माजी महापौर राखी कंचलार्वार यांचे पती संजय कंचर्लावार भानापेठ प्रभाग क्रमांक ११ मधून विजयी झाले. त्यांनी काँग्रेसचे पंकज आईंचवार यांचा पराभव केला.

## महानगरपालिका निवडणुकीत माजी आमदाराचा पराभव

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :



शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार प्रकाश गजभिये महापालिकेच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरले. त्यांनी नागपूर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १३ मधून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, या निवडणुकीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. भाजपच्या उमेदवाराने त्यांचा पराभव केला.

आमदार राहिलेल्या नेत्याचा अशाप्रकारे नगरसेवक निवडणुकीत पराभव होण्याचा हा राज्यातील बहूदा पहिलाच प्रसंग असावा. विशेष म्हणजे माजी आमदार गजभीये हे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांचे निकटवर्ती होते. काही महिन्यांपूर्वीच पवार नागपूर दौऱ्यावर असताना त्यांनी गजभीये यांचा घरी भेट देत तेथे भोजनही केले होते.

प्रकाश गजभिये यांचा राजकीय प्रवास नगरसेवक म्हणूनच सुरू झाला होता. नागपूर महापालिकेत त्यांनी नगरसेवक म्हणून काम केले असून त्या काळात ते केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जात होते. मात्र आठवले यांनी भाजपशी जवळीक साधल्यानंतर गजभिये यांनी त्यांची साथ सोडत स्वतंत्र भूमिका घेतली. त्यानंतर ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या संपर्कात आले. विधान परिषदेचा कार्यकाळ संपल्यानंतर आता त्यांनी मनपात भाग्य आजमावले. मात्र पराभव पदरी पडला.

## राज्यात महानगरपालिकांसाठी गुरूवारी झालेल्या मतदानाची टक्केवारी

| अ.क्र. | महानगरपालिकेचे नाव | एकूण मतदार | एकूण मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई | १,०३,४४,३१५ | ५४,७६,०११ | ५२.९४ |
| २ | ठाणे | १६,४९,८६९ | ९,१७,१२३ | ५५.५९ |
| ३ | कल्याण-डोंबिवली | १४,२५,०८६ | ७,१७,१०७ | ५०.३२ |
| ४ | नवी मुंबई | ९,४८,४६० | ५,४२,०७४ | ५७.१५ |
| ५ | उल्हासनगर | ४,३९,९१२ | २,२९,१७९ | ५२.१० |
| ६ | भिवंडी-निजामपूर | ६,६९,०३३ | ३,५७,४८५ | ५३.४३ |
| ७ | मीरा-भाईंदर | ८,१९,१५१ | ३,९८,४४५ | ४८.६४ |
| ८ | वसई-विरार | ११,२६,४०० | ६,४३,४२७ | ५७.१२ |
| ९ | पनवेल | ५,५४,५७८ | ३,०८,७०८ | ५५.६७ |
| १० | नाशिक | १३,६०,७२२ | ७,७१,१३२ | ५६.६७ |
| ११ | मालेगाव | ५,१७,६६३ | ३,३१,७२६ | ६४.०८ |
| १२ | धुळे | ४,३०,३८३ | २,४४,१४३ | ५६.७३ |
| १३ | जळगाव | ४,३८,५२३ | २,३५,०५० | ५३.६० |
| १४ | अहिल्यानगर | ३,०७,००९ | १,९८,५५८ | ६४.६७ |
| १५ | पुणे | ३५,५२,६३७ | १८,६२,४०८ | ५२.४२ |
| १६ | पिंपरी-चिंचवड | १७,१३,८९१ | ९,८९,०२६ | ५७.७१ |
| १७ | सोलापूर | ९,२४,७०६ | ४,९०,२७६ | ५३.०२ |
| १८ | कोल्हापूर | ४,९४,७११ | ३,२९,१३९ | ६६.५३ |
| १९ | सांगली-मिरज-कुपवाड | ४,५४,४३० | ,७७,३४६ | ६१.०३ |
| २० | छत्रपती संभाजीनगर | ११,१८,२८४ | ६,६९,००१ | ५९.८२ |
| २१ | नांदेड-वाघला | ५,०१,७९९ | ३,०७,९३४ | ६१.३७ |
| २२ | लातूर | ३,२१,३५४ | १,९३,०६१ | ६०.०८ |
| २३ | परभणी | २,६१,२३९ | १,७२,३९२ | ६५.९९ |
| २४ | अमरावती | ६,७७,१८० | ३,६६,३८१ | ५४.१० |
| २'५ | अकोला | ५,५०,०६० | ३,०५,९०७ | ५५.६१ |
| २६ | नागपूर | २४,८३,११२ | १२,७५,९०० | ५१.३८ |
| २७ | चंद्रपूर | २,९९,९९४ | १,७०,६६७ | ५६.८९ |
| २८ | इचलकरंजी | २,४८,९०७ | १,७३,६४१ | ६९.७६ |
| २९ | जालना | २,४५,९२९ | १,५०,४०६ | ६१.१६ |
| एकूण | | ३,४८,७९,३३७ | १,९१,०३,६५३ | ५४.७७ |